मंगळवार, 11 ऑक्टोबर 2022
किमत 5 रुपये | औरंगाबाद (महाराष्ट्र)
मराठी दैनिक
वर्ष - 02 अंक - 66
Title Code : MAHMAR51117

# आधुनिक केसरी

MARATHI • DAINIK • AURANGABAD (MAHARASHTRA) • TUESDAY 11 OCTOBER 2022 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | YEAR-02 • ISSUE-66 • TITLE CODE : MAHMAR51117 • PAGE-12 • PRICE-5

# पाऊस पिच्छा सोडेना !

## वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे पावसाळा संपल्यानंतरही पाऊस

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई : गणपती गेले, मागोमाग नवरात्र सरली, दसरा झाला आणि आता दिवाळी ऐन ८ दिवसांवर आली आहे मात्र अजूनही पावसाळा संपण्याची काही चिन्हे दिसत नाहीत. सहसा जून ते सप्टेंबर या कालावधीला पावसाळा म्हणतात हे आपण सगळेच शाळेत शिकलो आहोत पण मागील काही वर्षांपासून सप्टेंबर सोडाच पण पार जानेवारी पर्यंतही पाऊस टिकून असतो. पाऊस न पडणाऱ्या परिस्थितीला अनेकजण पर्यावरणाची हानी, वृक्षतोड अशी कारणे जोडतात पण जर पाऊस अधिक पडत असेल तर दोष कोणाचा? निसर्गाच्या या प्रक्रियेत नेमके आपले काही चुकतेय का? आताही ऑक्टोबर महिना सुरु आहे. महाराष्ट्राच्या गावोगावीच नव्हे तर मुंबई, पुणे अशा मुख्य शहरांमध्येही अजून पावसाचा जोर काही ओसरलेला नाही.**

ऑक्टोबरमध्ये मान्सूनच्या परतीची वेळ असते, मात्र अजूनही अनेक राज्यांमध्ये पाऊस सुरूच आहे. दिल्ली, महाराष्ट्र, यूपीसह अनेक राज्यांमध्ये सोमवारी मुसळधार पाऊस झाला. सुमारे 12 तास झालेल्या पावसामुळे दिल्लीतील अनेक भाग ठप्प झाले होते. दिल्ली पोलिसांनी प्रवाशांना हे लक्षात घेऊनच प्रवास योजना बनवण्याचा सल्ला दिला. हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार महाराष्ट्रासह 17 राज्यांमध्ये पुढील तीन दिवस मुसळधार पाऊस पडू शकतो. IMD नुसार येत्या 2-3 दिवसांत मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वेस्टर्न डिस्टर्बन्समुळे पावसाळा संपल्यानंतरही पाऊस पडत आहे. चक्रीवादळाचा प्रभाव किनारी आंध्र प्रदेश आणि लगतच्या भागात आहे. दक्षिण बंगालच्या उपसागराच्या मध्यभागी चक्रीवादळाचा प्रभाव कायम आहे. हवामान खात्याने मुंबई आणि लगतच्या ठाणे, पालघर आणि कोकण विभागातील जिल्ह्यांसाठी पुढील दोन दिवस येलो अलर्ट जारी केला आहे. पुढचे 3 दिवस राज्यात गडगडाटासह पाऊस पडण्याची शक्यता आहे. सोसाट्याचा वाराही वाहण्याची



शक्यता असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. आज पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सांगली, पुणे, ठाणे, अहमदनगर, सोलापूर, लातूर, जालना, औरंगाबाद, जळगाव, धुळे, नाशिक, नंदूरबार या जिल्ह्यांसाठी यलो अलर्ट जारी केला आहे. महाराष्ट्रासह देशातील अनेक भागात सध्या पाऊस सुरु आहे. गोव्यासह कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यात जोरदार पावसाची नोंद झाली असल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. पुढील 3 ते 4 दिवस कर्नाटकचा अंतर्गत भाग, आंध्र प्रदेशच्या किनारी भागात जोरदार पावसाची शक्यता आहे. सध्या मान्सूनचा माघारीचा प्रवास सुरु आहे. आग्रा, ग्वाल्हेर या भागातून मान्सून माघारी परतला आहे.

## चर्चेतली बातमी

### रशियाने युक्रेनवर डागले ७५ क्षेपणास्त्र

आधुनिक केसरी न्यूज

**नवी दिल्ली :** युक्रेन आणि रशियामधील संघर्ष दिवसेंदिवस वाढत चालला आहे. रशियाने युक्रेनच्या अनेक शहरांवर ७५ क्षेपणास्त्र डागले आहेत. क्रिमिया आणि रशियामधील पुलावर स्फोट घडवल्याच्या रशियाच्या आरोपानंतर आज हा क्षेपणास्त्र हल्ला करण्यात आला आहे. या हल्ल्यात पाच जणांचा मृत्यू झाला आहे. शांतताप्रिय लोकांवर केलेला हा निर्दयी हल्ला आहे, अशी प्रतिक्रिया युक्रेनचे अध्यक्ष वोलोदिमिर झेलेन्स्की यांनी दिली आहे. या हल्ल्यानंतर घरातून बाहेर न पडण्याचे आवाहन नागरिकांना झेलेन्स्की यांनी केले आहे. त्यांना आम्हाला पृथ्वीवरूनच पुसून टाकायचे आहे, असे म्हणत झेलेन्स्की यांनी रशियाला सुनावले आहे. शहरातील अनेक शहरांमध्ये हा हल्ला करण्यात आल्याची माहिती युक्रेनच्या अध्यक्षांच्या कार्यालयाचे उपप्रमुख कायरेलो त्मोशेन्को यांनी दिली आहे. शहरातील नागरिकांनी सुरक्षित स्थळी आश्रय घेण्याचे आव्हान सोशल मीडियावरुन त्मोशेन्को यांनी केले आहे. स्थानिक वेळेनुसार किव्हमध्ये सकाळी ८ वाजून १५ मिनिटांनी क्षेपणास्त्र हल्ला झाला आहे. यानंतर शहरात गोंधळ निर्माण झाला असून नागरिकांमध्ये घबराटीचं वातावरण आहे. किव्हमध्ये पाच स्फोट झाले आहेत.

# एकनाथ खडसेंनी खडसावले

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** राष्ट्रवादीचे नेते एकनाथ खडसे यांनी शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंसह मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंवर पक्षचिन्ह गोठवल्यानंतर सडकून टीका केली आहे. दोघांच्या भांडणामुळे शिवसेनेचे दोन तुकडे झाले असून पक्ष दुभंगला आहे, असे जळगावातील राष्ट्रवादीच्या कार्यालयात पार पडलेल्या पत्रकार परिषदेत खडसे यांनी म्हटले आहे. सेनेतील ही फूट राज्याच्या दृष्टीने योग्य नाही. यामुळे भाजपाला मजबूत होण्याची संधी मिळत असल्याचे खडसे म्हणाले आहेत. शिवसेनेची सद्यस्थिती पाहता उद्धव ठाकरे किंवा एकनाथ शिंदेंनी काय केलं? यावरुन दोष देण्यात काहीही अर्थ नाही. पक्षप्रमुख म्हणून चुका होत राहतात. काही चुका या उद्धव ठाकरे यांच्याकडूनही झाल्या असतील. मात्र, एखादी चूक एवढी मोठी नसावी की ज्यामुळे पक्ष संपवून टाकावा. आता तेही संपले आणि तुम्हीही संपले, अशी स्थिती निर्माण होता कामा नये असे खडसे यांनी म्हटले आहे. उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे गटाच्या संघर्षावर न्यायालयाच्या निर्णयाकडे सर्वजण आशेने पाहत आहे. मात्र, न्यायालय सुद्धा काही वेगळा निर्णय देईल असे वाटत नसल्याचे मत खडसे यांनी व्यक्त केले. बाळासाहेब ठाकरे यांनी मोठ्या मेहनतीने शिवसेना राज्यात उभी केली. त्यांच्याच मेहनतीमुळे धनुष्यबाणाला एक वेगळी प्रतिष्ठा संपूर्ण महाराष्ट्रात मिळाली, असे खडसे यांनी म्हटले आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाने शिवसेना हे नाव आणि धनुष्यबाण हे पक्षचिन्ह तात्पुरत्या स्वरुपात गोठवण्याचा निर्णय शनिवारी सायंकाळी जाहीर केला. अंधेरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर आयोगाने हा निर्णय घेतला आहे. यामुळे उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंना या निवडणुकीत शिवसेनेचे नाव आणि चिन्ह वापरता येणार नसल्याने नवा पेच निर्माण झाला आहे.

# मुलायम सिंह यादव यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**गुरुग्राम :** उत्तर प्रदेशचे माजी मुख्यमंत्री आणि समाजवादी पार्टीचे (सपा) संस्थापक मुलायम सिंह यादव यांचं गुरुग्राममधील रुग्णालयात उपचारांदरम्यान निधन झालं आहे. ते ८२ वर्षांचे होते. गुरुग्राममधील मेदांता रुग्णालयामध्ये मागील काही दिवसांपासून त्यांच्यावर उपचार सुरु होते. मुलायम यांचा जन्म २९ नोव्हेंबर १९३९ साली उत्तर प्रदेशमधील इटावा येथे झाला. त्यांनी अगदी तरुण वयापासून राजकारणात सक्रीय सहभाग घेतला होता. मुलायम सिंह यादव यांनी तीन वेळा उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्री पद भूषवलं आहे. तसेच १९९६ ते १९९८ दरम्यान ते केंद्र सरकारमध्ये संरक्षणमंत्रीही होते. १९९२ साली मुलायम सिंह यांनी समाजवादी पक्षाची स्थापना केली. ५ डिसेंबर १९८९ रोजी मुलायम यांनी पहिल्यांदा राज्याच्या मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली होती. ते २४ जानेवारी १९९१ पर्यंत या पदावर कार्यकरत होते. नंतर मायावती राज्याच्या मुख्यमंत्री झाल्या. १९९२ साली समाजवादी पक्षाची स्थापना केल्यानंतर वर्षभरात म्हणजेच ५ डिसेंबर १९९३ रोजी मुलायम सिंह दुसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदावर विराजमान झाले. पुढील ११ वर्षांमध्ये सातत्याने संघर्ष करत त्यांनी तिसऱ्यांदा मुख्यमंत्रीपदापर्यंत मजल मारली. २९ ऑगस्ट २००३ रोजी यांनी तिसऱ्यांदा उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्रीपदाची शपथ घेतली. त्यांनी पाच वर्षांचा कार्यकाळ पूर्ण करण्याआधीच म्हणजेच चार वर्ष झाल्यानंतर ११ मे २००७ रोजी पदाचा राजीनामा दिला.

# ओला दुष्काळ जाहीर करा; अन्यथा रास्ता रोको

## लोणार तालुक्यात ढगफुटीसदृश पाऊस : अन्न-धान्यासहित लाखो रुपयांचे नुकसान


आधुनिक केसरी न्यूज







लोणार : तालुक्यातील सुलतानपूरसह परिसरामध्ये गेल्या ४८ तासापासुन ढगफुटीदृष्य पाऊस सुरु असून नागरिकांचे व शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. यामध्ये अनेक घरामध्ये पाणी घुसून अन्न धान्यासहीत लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. या नुकसानीचे पंचनामे करुन सुलतानपूर येथील वार्ड नं. ५ व ६ मधील ज्या नागरिकांचे घरकुल मंजुरात यादीमध्ये नावे आहेत त्यांना तत्काळ उद्दीष्ट देऊन घरकुलाचा हप्ता देण्यात यावा. यामध्ये सोयाबीन, तूर, मका सर्वच पिकाचे नुकसान होऊन ते मातीत मिसळले आहे. याकरीता बळीराजाला हेक्टरी ५० हजार मदत देण्यात यावी. बोरखेडी जक्शनचे काम आहे ते काम अर्धवट व बोगस पध्दतीने झाल्यामुळे बोरखेडी लगतच्या वार्ड नं.६ मधील घेवंदे यांच्या घरामध्ये, दुकानामध्ये व तसेच आजुबाजूच्या सर्वच वार्डामध्ये पाणी शिरले आहे. याला कारणीभूत असणाऱ्या ग्रामपंचायत, कन्ट्रक्शन ठेकेदार यांचा परवाना रद्द करुन कामचुकार ग्रामपंचायत प्रशासनावर फौजदारी कार्यवाही करण्यात यावी. सुलतानपुर व परिसरामध्ये अनेक महिन्यांपासून महावितरणच्या भोंगळ कारभारामुळे महावितरण ग्राहकांना व नागरीकांना मानसिक त्रास होत आहे. यामध्ये ऐन गौरी गणपती, नवरात्री, कोजागीरी पोर्णीमा या महत्त्वाच्या सनउत्सवामध्ये अनेकवेळा विज जाणे, ड्यु उडणे, ट्रान्सफार्मर जळणे, सुलतानपुर येथील बसस्टॅन्ड डी. पी. चे दोन दोन तीन तीन दिवस ट्रान्सफार्मर न बसविणे त्यामुळे नागिरकांचे हाल झाले. याला जबाबदार आणाऱ्या कामचुकार व कर्तव्यशुन्य अधिकारी कर्मचाऱ्यावर प्रशासकीय फौजदारी कार्यवाही करण्यात यावी. गेल्या पंधरा ते विस वर्षापासून लोणार ते सुलतानपुर परिसरामध्ये जे कर्मचारी एकाच ठिकाणी ड्युटीवर आहेत त्यांची चौकशी करुन या अधिकारी व कर्मचारी यांच्या हलगर्जीपणामुळे महावितरणचे झालेले नुकसान भरपाई करुन घेण्यात यावी. अन्यथा दि.१४/१०/२०२२ रोजी सुलतानपुर येथे मुंबई नागपुर हायवेवर उग्र स्वरुपाचे रस्ता रोको आंदोलन करण्यात येईल असा इशारा वंचित बहुजनचे नेते संघपाल नागवंशी पनाड यांनी दिला. विविध मागण्यांचे निवेदन लोणार तहसीलदार मार्फत मुख्यमंत्री यांना देण्यात आले. यावेळी संगपाल नागवंशी पनाड, अनिता घेवंदे, संतोष शिंदे, भानदाम पवार, विलास दाभाडे, शे.करामत, सुरेश मोरे, अन्सार खा, बबन गायकवाड, श्रावण गायकवाड, संतोष गव्हाने, शे.अलीम, सतिश वाघ, विशाल पनाड, किरन पनाड,प्रसेंजित पनाड, राजहंस जावळे, आतिष पनाड, शे.जुबेर, मनोहर मोरे, शे.अखतर आदी मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.




विश्वास देशपांडे
संपर्क क्र. 9403749932

# तात्या आणि सोमनाथ ...

आधुनिक केसरी

कधी कधी आपल्याला अत्यंत साधी वाटणारी माणसेही काही तरी शिकवून जातात. आपण नेहमी वरच्या रंगरूपाला भुलणारी माणसं. पण कधी कधी वरवरचे हे रंगरूप फसवं पण असू शकतं. संत चोखामेळा म्हणतात, ‘ ऊस डोंगा परी रस नव्हे डोंगा, काय भुललासी वरलिया रंगा...’ हेअगदी खरे आहे. कधी कधी बाजारात आपण भाजी घ्यायला जातो. तेथे पाणी मारलेल्या भाज्या, रासायनिक खते वापरून वाढवलेल्या भाज्या किंवा हायब्रीड भाज्या अगदी हिरव्यागार, ताज्या टवटवीत दिसतात. पण आरोग्याच्या दृष्टीने त्या चांगल्या नसतात. याउलट सेंद्रिय भाज्या, गावाराणी भाज्या दिसायला आकर्षक दिसत नाहीत पण त्या आरोग्याला चांगल्या असतात. अशीच माझी गाठ अगदी साध्या दिसणाऱ्या , फारसे न शिकलेल्या माणसांच्या एका जोडीशी पडली. झाले असे की काही दिवसांपूर्वी मी माझ्या घराच्या दुरुस्तीचे थोडेसे काम काढले होते. जुना किचन ओटा पाडून नवीन करायचा होता आणि इतरही काही किरकोळ कामे होती. या कामासाठी मी माझ्या परिचयातल्या सोमनाथ नावाच्या मिस्त्रीला बोलावलं होतं. चाळीसगाव जवळच असलेले तांबोळे नावाचे त्याचे गाव. तिथून तो कामासाठी यायचा. सकाळी नऊ साडेनऊलाच सोमनाथ मिस्त्री आणि त्याची माणसे कामासाठी हजर व्हायची. दोन तीन दिवसानंतर किचन ओट्याचे मोजमाप करण्यासाठी सोमनाथ मिस्त्रीसोबत एक मध्यम उंची आणि सडपातळ बांधा असलेली एक व्यक्ती होती. अंगात अगदी साधे, इस्त्री न केलेले पण स्वच्छ सुती कपडे त्यांनी घातले होते. पांढरा शर्ट आणि पांढरा पायजमा. त्यांच्या डोक्यावरचे केस पांढरे झाले होते. वर्ण गौर होता. चेहऱ्यावर तेज होते. त्यांचे वय किमान साठ पासष्ट वर्षे तरी असावे असे वाटत होते. सोमनाथ मिस्त्री मोजमाप करत असताना मधून मधून त्या व्यक्तीला काहीतरी विचारीत होता. बोलताना तो त्यांना तात्या असे संबोधत होता. तात्यांचे बोलणे जरा खेड्यातील बोलीभाषेतच होते. पण बोलताना त्यांचा अनुभव, हुशारी सहज लक्षात येत होती.

मग मी सोमनाथ मिस्त्रीला विचारले की हे कोण ? तो म्हणाला, ‘ हे तात्या. माझ्याच गावी राहतात. गवंडी काम करतात. बऱ्याच वेळा काही जास्तीचे काम असले की मी त्यांना बोलावून घेतो. ‘ बांधकामाची पूर्वतयारी आणि विटा, वाळू,सिमेंट इ आवश्यक ते बांधकाम साहित्य मागवल्यानंतर प्रत्यक्ष कामाला सुरुवात झाली. तिसऱ्या चौथ्या दिवसापासून तात्या कामासाठी नियमितपणे येऊ लागले.

(क्रमशः)



## आनंदी पहाट

# चिंता विविध गोष्टींमुळे होऊ शकते

आधुनिक केसरी

दररोजच्या चिंता तुमच्या विचारांमध्ये तुम्हाला अडकवतात, तर काही चिंता अनेकदा शरीरात शारीरिकरित्या प्रकट होतात. त्यामुळे तुम्हाला अशक्त किंवा हलके वाटू शकते. चिंताग्रस्त विकार वयानुसार वाईट होतातच असे नाही, परंतु चिंताग्रस्त लोकांची संख्या आयुष्यभर बदलते. वृद्धापकाळात चिंता अधिक सामान्य होते आणि मध्यमवयीन प्रौढांमध्ये सर्वात सामान्य असते. मेंदूतील रासायनिक प्रक्रियांमुळे चिंता प्रबळ तेव्हा होते, जेव्हा एखाद्या व्यक्तीला चिंता वाटते आणि त्याला लक्ष केंद्रित करण्यास किंवा स्पष्टपणे विचार करण्यास त्रास होत असतो. मानसिक आरोग्य निदान आणि शारीरिक आजारांसह अनेक परिस्थितींमुळे चिंता निर्माण होऊ शकतात. अधूनमधून चिंता अनुभवणे सामान्य आहे असे वाटत असले तरीही, विशेषतः उच्च तणावाच्या काळात त्याचा खूप मोठा आणि विपरीत परिणाम भोगावा लागत असतो.



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

मानवी अनुभवातील राग आणि दुःख यासारख्या भावनांची भूमिका स्पष्टपणे समजून घेतली पाहिजे. जर तुम्हाला चिंता किंवा फोबियासारखा प्रकार असेल तर, एकांत, मनःशांती, ध्यानाभ्यास तुम्हाला शांत वाटण्यास तसेच इतर समस्यांना तोंड देण्यास, अधिक सक्षम होण्यास मदत करू शकतात. रात्रीच्या वेळी तुमची चिंता वाढण्याची अनेक कारणे असू शकतात. दैनंदिन ताणतणाव, झोपेच्या खराब सवयी आणि आरोग्याच्या इतर परिस्थितींमुळे रात्रीच्या वेळी चिंता आणि पॅनीक अटॅक वाढू शकतात. अर्थात, त्यावर अनेक उपचार उपलब्ध आहेत जे तुमची चिंता कमी करण्यात आणि तुमच्या झोपेची गुणवत्ता सुधारण्यास मदत करू शकतात. चिंता विविध गोष्टींमुळे होऊ शकते जसे कि, तणाव, अनुवांशिकता, मेंदूचे रसायनशास्त्र, क्लेशकारक घटना किंवा पर्यावरणीय घटक ही होत. चिंताविरोधी औषधाने लक्षणे कमी करता येतात, परंतु औषधोपचार करूनही, काही जणांना अजूनही काही चिंता किंवा पॅनीक अटॅकचा अनुभव येऊ शकतो.



आधुनिक केसरी

## पुण्यवान धर्म | वैष्णवांचा ||

कुणाशी नसावा | वैर दुजाभाव ||
आपुला तो गाव | परलोकी ||१||

चार पाच दिन | मुक्काम येथला ||
कलंक कशाला | माथी घेतो ||२||

नांदण्या सासरी | धाडीले आम्हास ||
आनंदे निवास | बांधू येथे ||३||

नाव त्याचे घेऊ | गावूनी अभंग ||
संसार अथांग | तरावया ||४||

काया वाचा मने | घडावे सत्कर्म ||
पुण्यवान धर्म | वैष्णवांचा ||५||



प्रा.ज्ञानेश्वर कुलकर्णी (वतनी)
संपर्क क्र. ९४०३०२९१७८


## “निरूपण”

आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

**जगदम्ब नमस्तुभ्यं सर्वत्र सिद्धिरस्तु मे।**
**मार्गे चापि सभायां च संप्रेषणे च भाषणे।। ४४ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. मार्गात, सभेत, सम्प्रेषणात, भाषणात सर्वत्र माझी सिद्धी असावी.
**जगदम्ब नमस्तुभ्यं यशो देहि रिपुं जहि।**
**जगदम्ब नमस्तुभ्यं भवेत् सर्वं शुभं शुभम्।। ४५ ।।**
जगदंबिके, तुला नमस्कार असो. यश दे. शत्रूचा विनाश कर. जगदंबिके, तुला नमस्कार असो. सर्व काही शुभ शुभ व्हावे.



## ।। दासबोध स्तवन ।।

## अनिर्वाच्य निरुपण

आधुनिक केसरी

सतत संताच्या संगतीत रहावे सज्जनांच्या बरोबर असले की आपले आचार विचार देहबोली सगळेच सात्विक होते . समाधान म्हणजे ब्रम्हज्ञान, अनुभवण्यासारखी गोष्ट,वेदांचे रहस्य,केवळ अनुभव अगदी शुध्द जाणीव ही तर समाधानाची जागा आहे. समाधान शब्दांतसांगता येत नाही. पण ते सांगितल्यावाचून कळणारही नाही. ईथे समर्थांनी पहिल्याच ओवीत गुळाची ऊपमा दिली आहे. गुळ खाल्यावर जसे समाधान होते. म्हणजे समाधान हे स्थिरबुध्दीचे लक्षण आहे असे मला वाटते. म्हणून सद्गुरू चरणीं समाधान मिळवावे. सद्गुरू जे सांगतात त्याप्रमाणे वागले तर समाधान मिळणें अवघड नाही. प्रथम सद्गुरू सांगतात की मी कोण आहे याचा शोध घेता घेता स्वस्वरूप साक्षात्कार होतो.मी जो खोटा मुखवटा घालुन फिरत होतो तो मी नाहींसा होऊन परमात्म्याशी एकरूप होतो. तदाकार पावतो आत्मानंद मिळतो समाधी अवस्था प्राप्त झाली. व मी ब्रम्ह आहे हा अनुभव येतो. जिकडेतिकडे ब्रम्हचं दिसु लागते अशी अवस्था येते तेथे पूर्ण समाधान होते. जो स्वतः चा शोध घेतो त्यालाच सदगुरुचां आशिर्वाद म्हणजे काय ते कळते.पुढे मग आत्मवस्तु हळूहळू कळू लागते. बुध्दीचा घट्ट निश्चय करावा तो करत असताना आपल्यातील “मी”पण शोधावा. अशाप्रकारेआपले मुळस्वरूप नीट ऊलगडले तर देहबुध्दीतील आपण मायानिर्मित आहोत असे समजेल.देहबुध्दीतील अशाश्वत “मी”बाजुला काढला की शुध्द आत्मवस्तु शिल्लक रहाते तेच समाधानाचे ठिकाण आहे.



सौ. उज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646

# शेतकरी जगाचा पोशिंदा....



सौ आरती राजाराम
परिचारक, पंढरपूर,
संपर्क क्र. 9404974345

आधुनिक केसरी

**शेतकऱ्यांएवढी दानत कुणातच नसते. अस्मानी, सुलतानी संकटे आली तरी त्यातून उभारणारा शेतकरी असतो. पिक पिकलं तर भाव नाही. भाव मिळाला तर पिकं नाही. लाईट असला तर पाणी नाही. पाणी आहे तर लाईट नाही. कामगार नाही, औषध महाग, किटकनाशक फवारणी करावी तर मुलखाची महाग. नाही फवारावी तर किडींचा प्रादुर्भाव. डॉ सांगतात फवारणी न केलेलं अन्न खावा. सगळ्यांनी सेंद्रिय शेतीचे उत्पादन घ्या. अरे पण नवनवीन किटक, किडींचा प्रादुर्भाव वाढतो आहे. नाही फवारणी करावी तर मग कसं सेंद्रिय शेती कशी करावी?**

आधुनिक केसरी

पाऊस पडला तर धुमाकूळ घालतो नाही नाहीतर डोळ्यातून पाणी काढतो. हातातोंडाशी आलेले पिक डोळ्यांदेखत निसटून जाताना किती यातना होत असतील याची कल्पना शहरवासीयांना आणि आजकालच्या पिढीला माहिती नाही. त्यात सुलतानी संकटांची काही कमी नाही. लाईटच्या कारभार रामभरोसे. चौदा ते सोळा तास लोडशेडींग. आपण मात्र पंधरा ते वीस मिनिटे बिनपंख्याचे राहू शकत नाही. सगळे झोपतात तेव्हा लाईट येते आणि मग कशाचीही तमा न बाळगता हा दार धरायला जाणार. पिकाला पाणी द्यायला रात्री अपरात्री कशाचीही भिती न वाटू देता. पेक्षा भितीचा पर्याय नाहीच. आपल्या पोटच्या मुलाप्रमाणे सांभाळत. स्वतःच्या पोटाला चिमटा घेऊन पिक सांभाळणारा जगाचा पोशिंदा.

कुणाकडून रूपायाची अपेक्षा नसणारा. पण वानोळा देण्यात कुणीच शेतकऱ्यांचा हात धरणारा नाही. तुम्ही एक मागितले तर टोपलीभर हसतमुखाने न्या जावा म्हणणारा फक्त शेतकरी राजाच असतो.

भाजी घेताना घासाघीस करायची. दहा रुपयांची पेंडी निम्म्या किंमतीत द्या म्हणून आग्रह करायचा. शेतकरी मनाचा उदारमतवादी तो पण लगेचच देतो. आपण मात्र एकदा हॉटेलमध्ये जावून दोन तीन हजार रुपये सहज उडवून येतो. पण भाजीपाल्याचे दर वाढले की महागाई वाढली. माणसांने काय खायचं? कसं जगायचं? असे प्रश्न विचारले जातात.

कधी आपण विचार केला? धुमाकूळ घालणाऱ्या पावसाने त्याच्या पिकांची दाणादाण उडविली. तो काय करणार? काय खाणार? दुष्काळ पडला पिकवणार काय? मुलांना कसं शिकवणार? त्यांचे पालनपोषण करण कठीण. लाड केव्हा करणार? त्याला वाटत नसेल का ? माझ्या मुलांनी चांगल्या पद्धतीने शिक्षण घ्यावे... मुली सुस्थळी पडाव्यात. त्यांच्या आईबाबांचे आरोग्य चांगले राहावे यासाठी त्यांच्यासाठी पैसे खर्च करता यावे म्हणून का होईना पुंजीला पैसा राहायला.

पण ह्या सगळ्यांवर उपाय. त्यांनीं पिकवलेल्या पिकाला चांगला भाव मिळालाच पाहिजे. नाही तर उद्या कोणीच शेती हा करणार नाही. जगाच्या पोशिंद्याने पिकवलेच नाही तर काय खाणार ह्याचा सगळ्यांनीच विचार केला पाहिजेच. कल्पना करून बघा. पुढील काळात अन्नला सोन्याचा भाव येईल आणि सोन्याला भाजीचा. काय होईल ? ह्याचा सगळ्यांनीच विचार केला तर आणि तरच शेतकरी पोशिंदा ठरेल. मग आजपासून सुरुवात करूया. रोखठोक शेतकऱ्यांकडून खरेदी करायची. भाजी घेताना शेतकऱ्यांकडून घ्यायची ते ही घासाघीस न करता.

पावसाचं गणित बसवायचे असेल तर प्रत्येकाने कमीत कमी आयुष्यात पाच तर झाडं लावायची आणि जगवायची मोठी होईपर्यंत सांभाळायची. पाऊस, शेतकरी ह्या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शेतकरी जगला तर आपण सगळे जगणार.



# ३६ भ्रमिष्टांचे पुनर्वसन करून स्वच्छ भारत अभियान

## कायापालट उपक्रमांतर्गत धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी केली साडेसातशे मनोरुग्णांना मदत







आधुनिक केसरी न्यूज

**नांदेड :** भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवस सेवा पंधरवड्यात धर्मभूषण ॲड. दिलीप ठाकूर यांनी कायापालट उपक्रमांतर्गत रस्त्यावर फिरणाऱ्या ३६ भ्रमिष्टांची कटिंग दाढी केल्यानंतर स्नान घालून नवीन कपडे व शंभर रुपयाचे बक्षीसी देऊन मोदी यांचे स्वच्छ भारत अभियान साकार करण्यासाठी नांदेडकरांतर्फे हातभार लावला. वीस महिन्याअखेर आत्तापर्यंत साडेसातशे पेक्षा जास्त भणंगांचा कायपालट करण्यात आला आहे. भाजपा महानगर नांदेड व लायन्स क्लब नांदेड सेंट्रल व अन्नपूर्णा, अमरनाथ यात्री संघाच्या वतीने खा. प्रतापराव पाटील चिखलीकर, भाजप जिल्हाध्यक्ष प्रवीण साले, लायन्स पूर्व प्रांतपाल दिलीप मोदी, प्रांतपाल पुरुषोत्तम जयपुरिया यांच्या मार्गदर्शनाखाली कायापालट उपक्रम दर महिन्याला राबविण्यात येतो. त्यानुसार लायन्स क्लब नांदेड अन्नपूर्णा चे अध्यक्ष अरुणकुमार काबरा, मंगेश पोफळे , सुरेश शर्मा, संजयकुमार गायकवाड यांनी शहरातून फिरुन वेगवेगळ्या ठिकाणाहून भ्रमिष्ठांना दुचाकी वर बालाजी मंदिर परिसरात आणण्यात आले. स्वंयसेवक बजरंग वाघमारे यांनी सर्वांची कटिंग दाढी केली. स्नानासाठी स्वच्छ व मुबलक पाण्याची व्यवस्था बालाजी मंदिरचे महंत कैलास महाराज वैष्णव यांच्यातर्फे करण्यात आली होती. कित्येक महिने अंघोळ न केलेल्या या भ्रमिष्टांना साबण लावून स्नान घालण्यात आले. स्वच्छ होऊन नवीन कपडे घातल्यामुळे त्यांच्या दिसण्यात अमुलाग्र बदल झाला होता. चार तास सुरु असलेल्या कार्यक्रमानंतर बालाजी मंदिरचा परिसर झाडून स्वच्छ करण्यात आला. गीता परिवाराचे संस्थापक अध्यक्ष ॲड. चिरंजीलाल दागडिया, अन्नपूर्णाच्या कोषाध्यक्ष सविता काबरा, शिवनरेश चौधरी यांनी उपक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. व्यसनमुक्तीचे डॉ.प्रकाश शिंदे, विद्यापीठाचे माजी क्रीडा संचालक प्रा. नंदू मेगदे ,भाजपा महिला मोर्चा जिल्हा सरचिटणीस अनुराधा गिराम, सलोना चव्हाण यांनी सदिच्छा भेट दिली. यादरम्यान एका अकरा वर्षीय मुलगा घरून रागावून त्या ठिकाणी आला. त्याला समजावून त्याचे घर शोधून दिलीप ठाकूर, कैलास महाराज, सुरेश शर्मा, बजरंग दलाचे शशिकांत पाटील यांनी पालकांच्या हवाली केले. पालकांनी सर्वांचे मनापासून धन्यवाद व्यक्त केले. यापुढे असहाय्य दिसणारे, कचरा वेचणारे, वेडे ,भिकारी, अपंग व्यक्ती आढळल्यास नांदेड शहरातील नागरिकांनी याची नोव्हेंबर महिन्याच्या पहिल्या रविवारी भाजप अथवा लायन्स सदस्यास माहिती द्यावी असे आवाहन संयोजक ॲड दिलीप ठाकूर यांनी केले आहे. स्वच्छता प्रिय असणाऱ्या नरेंद्र मोदी यांना वाढदिवसाची अनोखी भेट दिल्याबद्दल दिलीप ठाकूर यांचे सर्व स्तरातून कौतुक करण्यात येत आहे.

# आझाद मैदानावर महावितरण ऑपरेटर्सचे धरणे आंदोलन

आधुनिक केसरी न्यूज




**मुंबई :** आज सकाळपासून मुंबई येथील आझाद मैदानावर महावितरण मधील ऑपरेटर कर्मचारी उच्च वेतन वाढीच्या मागणीसह उपकेंद्रांच्या इतर मागण्यांसाठी धरणे आंदोलन करत आहेत. या धरणे आंदोलनात राज्यभरातील शेकडो कर्मचारी सहभागी झाले असून जोरदार घोषणाबाजी करीत लक्ष वेधून घेतले जात आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत ऑपरेटर्स संघटनेने १६ वर्षापासून प्रलंबित मागण्यांबाबत न्याय मिळत नसल्याने लोकशाही मार्गाने आंदोलनाची भुमिका घेतली आहे. त्यानुसार आज १० ऑक्टोबर रोजी आझाद मैदान येथे आंदोलनासाठी संघटनेचे पदाधिकारी, सभासद उपस्थित झाले असून महावितरणचे विविध परीमंडळातील शेकडो यंत्रचालक मुंबईत दाखल झाले आहेत. यात प्रामुख्याने औरंगाबाद, नांदेड, लातुर, बारामती, पुणे, कोल्हापूर, चंद्रपुर, अकोला, अमरावती, नाशिक, जळगाव, रत्नागिरी, भांडुप आदी परीमंडळातील यंत्रचालक कर्मचारी सहभागी असल्याची माहिती संघटनेचे अध्यक्ष सुधाकर जायभाये यांनी दिली आहे. या अंदोलनावर वीज उद्योगातील सर्वच कर्मचारी यांचे लक्ष असून उद्योगात कार्यरत अनेक संघटनांनी या अंदोलनास सक्रीय पाठिंबा दर्शविला असल्याची माहिती सरचिटणीस नवनाथ पवार यांनी दिली आहे.

# शेतकऱ्यांसाठी ऑनलाईन नोंदणी जाचक : पटोले

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शासकीय खरेदी आधारभूत केंद्राअंतर्गत धान खरेदी केंद्रावर ऑनलाईन नोंदणीच्या शासकीय निर्णयाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. ई-पीक पाहणी, सातबारासह शेतकऱ्यांची सर्व माहिती सरकारकडे असताना पुन्हा धान खरेदी केंद्रावर जाऊन ऑलनाईन नोंदणी करण्यास सांगणे हे गरिब, सामान्य शेतकऱ्यांचा छळ करणारे तसेच अन्यायकारी आहे, असे महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी म्हटले आहे. यासंदर्भात बोलताना नाना पटोले म्हणाले की, शासन निर्णयानुसार धान खरेदीची मुदत १५ ऑक्टोबरपर्यंत देण्यात आली आहे परंतु सरकारच्या जाचक अटींमुळे शेतकरी मेटाकुटीला आला आहे. खरेदी केंद्रात जाऊन शेतकऱ्याला प्रत्यक्ष लाईव्ह फोटो अपलोड करावा लागणार आहे. त्याचबरोबर सातबारा, आधारकार्ड, बँक खात्याची माहिती ही कागदपत्रेही अपलोड करावी लागत आहेत. या प्रक्रियेसाठी वेळ लागत आहे. त्यातच खरेदी केंद्रांची संख्याही अपुरी असल्याने अडचणीत आणखी भर पडली आहे.

# स्मार्ट इंडिया हॅकेथॉन - २०२२ स्पर्धेत छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालय देशात प्रथम

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** येथील छत्रपती शाहु महाराज शिक्षण संस्था संचालित छत्रपती शाहू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी स्मार्ट इंडिया हॅकेथॉन - २०२२ या राष्ट्रीय स्पर्धेत सहभाग नोंदवुन देशात प्रथम क्रमांक पटकावला. मानव संसाधन विकास मंत्रालय आणि भारतीय तंत्रशिक्षण परिषदेतर्फे आयोजित करण्यात आलेल्या या स्पर्धेत महाविद्यालयातील कॉम्पुटर सायन्स अँड इंजिनीअरिंग विभागातील तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी जिनिअस नूबस या टीम अंतर्गत ओडिशा येथील जी. आय. ई. टी. युनिव्हर्सिटी, गुणुपुर येथे सहभाग नोंदविला.

स्मार्ट इंडिया हॅकेथॉन ही भारत सरकार, मंत्रालये, विविध विभाग, उद्योग आणि इतर संस्थांच्या समस्यांचे निराकरण करण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी शिक्षण मंत्रालयाच्या इंनोव्हेशन सेलचा देशव्यापी उपक्रम आहे. या स्पर्धेमध्ये देशभरातील विविध महाविद्यालयातील २०३३ संघानी सहभाग नोंदविला होता. जिनिअस नूबस या टीमने सायबर सेक्युरिटी या विषया अंतर्गत नेटवर्क ट्रॅफिक अँनलायझर हे सॉफ्टवेअर बनविले. विद्यार्थ्यांनी रात्रं-दिवस परिश्रम घेत सलग ३६ तास कोडींग करत तीन फेऱ्यांमध्ये झालेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक पटकावला. सॉफ्टवेअर तयार करण्यासाठी टीममध्ये - शिवराज पाटील (टीम लीडर), आशिष सोळंके, सुमेध पवार, समृद्धी कुलकर्णी, विशाल मुऱ्हाडे, विजय कागदे हे ०६ विद्यार्थी आणि प्रा. वैशाली गायकवाड, प्रा. मीनाक्षी पाचपाटील हे दोंन फॅकल्टी मेंटॉर यांनी परिश्रम घेतले. जिनिअस नूबस या टीमच्या यशाबद्दल छत्रपती शाहू महाराज शिक्षण संस्थेचे सचिव पद्माकरराव मुळे, अध्यक्ष रणजित मुळे, प्रशासकीय अधिकारी डॉ. श्रीकांत देशमुख, छत्रपती शाहु अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास शिंदे, कॉम्पुटर सायन्स अँड इंजिनीअरिंग विभाग प्रमुख डॉ. संदीप अभंग यांनी अभिनंदन व कौतुक केले.

आरोग्याकडे दुर्लक्ष करू नका
आरोग्य हीच संपत्ती आहे
शहरातील एक विश्वसनीय सुपर मार्केट
महावीर
घर संसार



- घाऊक आणि किरकोळ
- किराणा, सुका मेवा, मसाले
- क्रॉकरी, घरगुती उपकरणे
- घर साफ करणारे साहित्य, स्टील आणि ॲल्युमिनियम
- प्लास्टिकच्या वस्तू आणि बरेच काही

सुमित 7620111118
राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअप ऑर्डर आणि कोणतीही ऑर्डर 9850017181
वितरण स्थिती 9021395308 9657398232
घाऊक चौकशी 7620111118 9527111185
www.mahavirbestprice.com
sumitparakh73@gmail.com
S.p. रोड, चेलीपुरा, शहागंज, औरंगाबाद
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर MIDC चिकलठाणा, औरंगाबाद

# मुलायम सिंह यादव

आधुनिक केसरी

समाजवादी पक्षाचे संस्थापक मुलायम सिंह यादव यांचे वयाच्या ८२ व्या वर्षी निधन झाले. मेदांता रुग्णालयात मुलायम सिंह यांनी अखेरचा श्वास घेतला. मुलायम सिंह यादव सध्या लोकसभेचे खासदार होते. राजकारणात येण्यापूर्वी ते शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे काम करत होते. मुलायम सिंह यादव यांनी करहल येथील जैन इंटर कॉलेजमधून शिक्षण पूर्ण केले आणि पुढे तिथेच शिक्षक म्हणून रुजू झाले. शिक्षक म्हणून ज्ञानदानाचे काम करताना ते सायकल वरुन प्रवास करायचे. इटावामधील सैफई या छोट्या गावामध्ये जन्म झालेल्या मुलायम सिंह यांनी शिक्षक ते राजकारणी असा प्रवास केला. मुलायम सिंह यादव यांचा जन्म २१ नोव्हेंबर १९३९ मध्ये उत्तर प्रदेशच्या सैफईमध्ये झाला होता. मुलायम सिंह यादव यांना चार भाऊ आणि एक बहीण होती. इटावा ते दिल्लीपर्यंतचे राजकारण गाजवणाऱ्या मुलायम सिंह यादव यांनी उत्तर प्रदेशचे तीन वेळा मुख्यमंत्रिपद भूषवले आहे. मुलायम सिंह यादव यांनी देशाचे संरक्षणमंत्री म्हणून देखील काम केले. त्यांना नेताजी म्हणून देखील ओळखले जायचे. इटावामधील सैफई गावात जन्म झालेल्या मुलायम सिंह यादव यांना चार भाऊ आणि एक बहीण होती. मुलायम सिंह यादव यांनी पैलवान बनावं, अशी त्यांच्या वडिलांची इच्छा होती. मुलायम सिंह यादव यांना देखील लहानपणी कुस्तीची आवड होती. १९५५ मध्ये त्यांनी करहलच्या जैन इंटर कॉलेजमध्ये ९ वीमध्ये प्रवेश घेतला होता. मुलायम सिंह यादव यांनी १९५५ ते १९५९ मध्ये जैन इंटर कॉलेज, करहलमध्ये शिक्षण घेतलं. यावेळी त्यांनी त्यांची कुस्तीविषयची आवड जपली. १९६३ मध्ये ते करहलच्या जैन इंटर कॉलेजमध्ये सहायक अध्यापक म्हणून रुजू झाले. पुढे सलग १० वर्ष त्यांनी सहायक अध्यापक म्हणून काम केले. १९७४ मध्ये त्यांची पदोन्नती झाली आणि त्यांच्याकडे राज्यशास्त्र विभागासंदर्भातील जबाबदारी आली. जैन इंटर कॉलेजने मुलायम सिंह यादव यांच्याशी संबंधित प्रत्येक गोष्ट, कागदपत्रं जपून ठेवले आहे. १९८४ मध्ये वेळ मिळत नसल्याने मुलायम सिंह यादव यांनी जैन इंटर कॉलेजमधील सेवेचा राजीनामा दिला. मात्र, त्यांनी कॉलेजसोबतचे नाते तोडले नाही. मुख्यमंत्री असताना ते हेलिकॉप्टरने इटावाच्या जैन इंटर कॉलेजमध्ये पोहोचायचे. मुलायम सिहं यादव यांनी कुस्तीची आवड जपली होती. इटावामधील कुस्तीच्या लढतीत त्यांचा संपर्क तत्कालीन आमदार नत्थू सिंह यादव यांच्याशी आला. मुलायम सिंह यादव यांनी बॉलिवूडचे ज्येष्ठ अभिनेते अमिताभ बच्चन यांच्या नावानं महाविद्यालय देखील सुरु केले आहे.

# खासगी प्रवाशी वाहतूक नियंत्रित करण्याची गरज!



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**औरंगाबाद रोडवरील हॉटेल मिरची चौकात असलेल्या चौफुलीवर चिंतामणीची खाजगी लक्झरी बस आणि टँकर यांच्यात शनिवारी झालेल्या भीषण अपघातात 12 प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाल्याने परत एकदा खाजगी वाहतुकीने प्रवास करणाऱ्या प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न समोर आल्याने खाजगी प्रवाशी वाहतूक नियंत्रित करण्याची गरज निर्माण झाली आहे. या आधीदेखील अनेकदा खाजगी व शासकीय वाहने पेटली. सण 2020 मध्ये 363 2021 मध्ये 241 वाहनांना आग लागून अनुक्रमे 194 व 79 प्रवाशांचा होरपळून मृत्यू झाला. 2021 मध्ये बस अपघातात एकूण 4622 जणांचा मृत्यू तर 14,492 लोक जखमी झाले.**

शहराप्रमाणेच ग्रामीण भागातही अवैध प्रवासी वाहतुकीने कहर केला असून शहरात किमान काही प्रमाणात अशा वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला जात असल्याचे दिसत असले तरी ग्रामीण भागात वाहतूक पोलिसांचे अस्तित्वच कुठे दिसत नाही. काही ठिकाणी तर वाहतूक पोलीस आणि नियमबाह्य खासगी प्रवासी वाहतूक करणाऱ्यांचे संबंध इतके मधूर आहेत की, जणूकाही वाहतूक पोलिसांकडून खासगी वाहतूकदारांना कोणताही धोका कधीच होऊ शकणार नाही. त्यामुळे एकेका रिक्षा किंवा टॅक्सीत प्रमाणापेक्षा कितीतरी अधिक, काहीवेळा तर थेट टॅक्सीला मागे लटकून किंवा वर टपावर बसवून प्रवाशांची वाहतूक होताना दिसते. अशा प्रकारच्या वाहनांना कधी एखादा अपघात झाल्यास वाहतूक पोलिसांकडून काही दिवस कारवाईचे नाटक केले जाते. नंतर परिस्थिती पुन्हा 'जैसे थे' होते. ग्रामीण भाग असो कि शहरी भाग राज्य परिवहन मंडळाकडून होत असलेल्या वाहतूक सेवेत योग्य नियोजन नसल्याचा फायदा खासगी प्रवासी वाहतूकदारांना होत आहे. प्रवाशांच्या सोयीनुसार बसची सेवा नसणे, कधी तीन ते चार तास एकही बस नसणे आणि कधी एकाच तासात तीन-चार बस असणे, असे प्रकार भागात अनेक ठिकाणी पाहावयास मिळतात. या गैरसोयींना वैतागलेले प्रवासी सरळ खासगी वाहतुकीकडे आपला मोर्चा वळवितात. ग्रामीण व शहरी भागातील जवळपास बहुतेक बस स्थानकांना खासगी प्रवासी वाहतुकदारांचा गराडा पडलेला राहात असल्याने या वाहतुकदारांचे दलाल बस स्थानकातून प्रवासी पळविण्याचेही काम करतात. हे वाहतूकदार लहान मुलांचे कोणतेही भाडे घेत नाहीत, शिवाय प्रवासी सांगतील त्या ठिकाणी वाहन उभे करण्यात येते. या फायद्याच्या गोष्टींमुळेही बसऐवजी प्रवाशांकडून रिक्षा, टॅक्सी सेवेला प्राधान्य दिले जाते. अर्थात प्रवाशांच्या दृष्टीने या जमेच्या बाजू असल्या तरी खासगी प्रवासी वाहतूक ही तितकीच धोकादायकही आहे.

बस चालकावर जबाबदारीचे ओझे असल्याने सुरक्षितपणे बस चालविण्यास त्यांच्याकडून प्राधान्य दिले जाते. याउलट खासगी प्रवासी वाहतूकदारांना दिवसातून अधिकाधिक फेऱ्या करून कमाई करावयाची असल्याने त्यांच्याकडून वाहन चालविताना सुरक्षिततेऐवजी वेगाला अधिक प्राधान्य दिले जाते. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता अधिक असते. कोणत्याही गावाचे व शहराचे नाव घ्या, अवैध प्रवासी वाहतुकीने कळस गाठलेला दिसून येईल. वाहनांमध्ये प्रवासी अक्षरशः कोबून भरलेले असतात. एकेका बसेसमध्ये मर्यादा पेक्षा अधिक तर रिक्षात दहापेक्षा अधिक तर, टॅक्सी किंवा ॲपेरिक्षात हीच संख्या १५ ते २० दरम्यान गेलेली दिसून येईल. लग्नसराईत तर खासगी प्रवासी वाहतूकदारांची चांदीच चांदी असते. वाहनाच्या



मागे, टपावर तसेच पुढील भागावरही प्रवासी बसविलेले असतात. ही धोकादायक वाहतूक पोलिसांच्या देखत होत असतानाही त्यांच्याविरूध्द कोणत्याही प्रकारची कारवाई होताना दिसत नाही. वाहतूक पोलिसांना ठराविक 'हप्ता' दिल्यावर कारवाईपासून मुक्तता होत असल्याने वाहन चालक बिनधास्त प्रवाशी भरतात.हप्ता थकल्यावर मात्र पोलिसांकडून कारवाई होते. बऱ्याच वेळा रिक्षांची तपासणी होणार असल्याचे चालकांना आधीच कळलेले असते. अवैध प्रवासी वाहतूक करणाऱ्या एखाद्या वाहनास अपघात झाल्यावर या विषयाचा गवगवा होत असल्याने वाहतूक पोलिसांना काही दिवस कारवाईचा 'फार्स' करणे भाग पडते. वरीष्ठ अधिकाऱ्यांनी नियमितपणे ग्रामीण भागात व राष्ट्रीय महामार्गांवर तपासणी मोहीम सुरू केल्यास अशा प्रकारच्या अवैध वाहतुकीस आळा बसू शकेल, मात्र परिवहन अधिकारी व वाहतूक पोलीस कारवाई करण्यास दिरंगाई करतात किंवा केलीच तर थातूर मातुर करतात.

विशेष आपल्याकडे मुळातच वाहतुकी वरती परिणामकारक असे नियंत्रण कुठेही दिसत नाही. याचे मुख्य कारण आपल्या लोकांना कोणत्याही नियमांचे पालन करणे कधीच जमताना दिसत नाही. प्रत्येक नियम मागे आपल्याकडे ते मोडणाऱ्यांचीच संख्या जास्त आहे. वाहतूक विषयक कोणत्याही समस्येवर आपल्याकडे- सार्वजनिक शिस्तीचा अभाव असल्यामुळे- परिणामकारक उत्तर शोधता येत नाही.

सिंगापूर सारख्या शहरामध्ये आदर्श सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आहे. सर्व सार्वजनिक बसेस काटेकोरपणे ठराविक वेळी येतात व जातात. त्यांच्या मार्गात कोणतेही अडथळे नसतात. त्यामुळे वेळ पाळणे सर्वांना शक्य होते.आपल्याकडे वेळेची किंमत कोणालाच नाही त्यामुळे सार्वजनिक वाहतूक विस्कळीत असणेच आपल्या पथ्यावर पडते. कारण तितकी कारणे देऊन आपण आपली कामे आणि चुका एकमेकांवर ढकलू सर्वजण मोकळे होतात.

वाहतुकीचे नियम कोणीही पाळायला तयार नाही. सरकारी वाहन असो कि खाजगी. वाहतूक नियमांचे सर्रास उल्लंघणं होत असल्याने मोठं मोठे अपघात होतात. प्रवाशी वाहतूक असो कि मालवाहतूक मर्यादेपेक्षा जास्त प्रवाशी कोंबल्या जातात. बेशिस्त वाहनचालक, नियमांचे उल्लंघन, प्रादेशिक परिवहन विभागाचे दुर्लक्ष, वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष, चिरिमेरी घेण्याचा प्रकार व रस्त्यांची दुर्दशा यामुळे अपघात मोठ्या प्रमाणात होतात.मात्र बळी जातो तो सामान्य जनतेचा. निष्पाप व निरागस मुलं मुली व जेष्ठ नागरिकांसह अनेकां एकदा ळी जातो.

वाहनचालकांच्या दुर्लक्षपणामुळे अपघात झाल्याचे म्हटले आहे. यवतमाळ मुंबई ट्रॅव्हसचा जो अपघातात झाला. दोन्हीपैकी एका वाहनचालकाने जरी वेगाची मर्यादा तसेच चौफुलीची परिस्थिती पाहून वाहन थांबविले असते तर कदाचित अपघात घडला नसता व अनर्थ टळला असता.



मधुर सुनिल अग्रवाल
संपर्क क्र. 9579463001

# लोकसंख्या नियंत्रण कायदा

आधुनिक केसरी

**काही दिवसांपूर्वी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सुप्रिमो मोहन भागवत यांनी केंद्र सरकारला भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी कायदा करावा, असे सुचविले होते, त्यामुळे आता अनेक राजकीय पक्ष, व्यक्तींनीत्यांच्या वक्तव्यावर निशाणा साधून अशा महत्त्वाच्या मुद्द्याला कात्री लावण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. आधारित मुद्दा, आता मुद्दा हा आहे कीतो गंभीरपणे मुद्दा आहे का? जर हा मुद्दा असेल तर तो कास्ट आधारित मुद्दा आहे का? आणि अशा विषयावर विचार केला तर अजून बरेच प्रश्न निर्माण झालेआहेत.**

**भारताला स्वातंत्र्य मिळाल्यापासून भारतातील लोकसंख्या वाढः-**

| | |
|---|---|
| 1951 | 361,088,090 |
| 1961 | 438,936,918 |
| 1971 | 547,949,809 |
| 1981 | 685,184,69 |
| 1991 | 838,583,988 |
| 2001 | 1,028,737,436 |
| 2011 | 1,210,193,422 |

आता जर आपण प्रत्येक 10 वर्षांच्या संवेदनांनंतरचा ट्रेंड पाहिला तर आपण लोकसंख्येची किमान 20% वाढ पाहू शकतो आणि याचा थेट अर्थ असा आहे कीदर 50 वर्षांनी लोकसंख्या दुप्पट होते आणिआता आपल्यासमोर असलेल्या समस्यांकडे परत येत आहे :

**1. जमीन :** दिवसेंदिवस लोकसंख्या वाढत आहे परंतु आपल्या देशाची आणि जगाची जमीन मर्यादित आहेआपण अनेक गोष्टी विकसित करू शकतो परंतु आपण जमीन विकसित करू शकत नाही आणि लोकसंख्येची घनता लक्षात घेता प्रचंड वाढ होईल. जमिनीच्या कमतरतेमुळे राष्ट्रांमधील भांडणे वाढतील कारण प्रत्येक राष्ट्राला त्यांच्या लोकांनी त्यांच्या देशवासियांच्या मूलभूत गरजा पूर्ण कराव्यात असे वाटते.

**2. अन्न :** लोकसंख्या वाढल्यामुळे जी जमीन शेतीसाठी वापरावी लागते ती आता इमारतींसाठी वापरली जाईल ज्यामुळे अन्नाची उत्पादन क्षमता कमी होईल आणि परिणामी चिंताजनक परिस्थिती निर्माण होईल आणि परिणामी लोक जिंकतील. अन्न मिळत नाही.

**3. पिण्याचे पाणी :** आपल्या सर्वांना माहित आहे कीपृथ्वीचा 70% भाग पाण्याने व्यापलेला आहे परंतु त्या 70% पैकी फक्त आणि फक्त 2% पाणी पिण्यासाठी वापरता येते आणि आम्ही हे पाहण्यास सुरुवात केलीआहे की भारतातील अनेक ठिकाणी पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत आहे आणि ग्लोबलवॉर्मिंगमुळे देशाच्या भूगर्भातील पाण्याची पातळी आधीच खाली येण्यास सुरुवात झाली आहे ज्यामुळे त्या भागात जीवसृष्टी टिकणार नाही.

**4. माती :** हीदेखील एक सर्वात मोठी समस्या असेल जेव्हा केवळ जंगलतोडीमुळे लोकसंख्या वाढेल आणिभूजल कमी होईल तेव्हा मातीच्या गुणवत्तेवर परिणाम होईल आणि त्याचा थेट परिणाम शेतीवर होईल.



**5. हवामान बदल :** लोकसंख्या वाढत असल्याने झाडे आणि जंगले कमी होण्याच्या उलट इमारतीदेखील वाढत आहेत, परिणामी आपण पाहत आहोत की उन्हाळ्यात हवामानात बरेच बदल होत आहेत आणि कमाल तापमानात वाढ होते. भारतातील अनेक भागांमध्ये कमाल तापमान आधीच ४५ अंशओलांडले आहे.हिवाळ्यात प्रचंड थंडी असते आणि पावसाळ्यात देशातीलअनेक भागात पडणारा पाऊस असमान असतो. कधी अति कधी मध्यम असतो तर कधी पाऊस पडत नाही.

लोकसंख्येच्या वाढीमुळे अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले आहे आणि त्यावर उपाय म्हणजे लोकसंख्येवर नियंत्रण आहे, अनेक स्वयंसेवी संस्था, सामाजिक कार्ये, सरकारी कार्यक्रम यांनी लोकसंख्या नियंत्रणाबाबत जनजागृती सुरू केली आहे. परंतु ज्या निकालाची आपण अपेक्षा करत आहोत आणि जे निकाल आपल्यालामिळत आहेत ते गुणानुरूप नाहीत, त्यामुळे हे ग्राउंडरिॲलिटी आणि प्रभावी गोष्ट बनवण्यासाठी सरकारने कायदा आणण्याची गरज आहे, परंतु हा कायदा आणण्यापूर्वी भारतातील प्रत्येक व्यक्ती हा कायदा लिंग, धर्म या भौगोलिक क्षेत्रावर आधारित नसून हा कायदा देशातील प्रत्येक व्यक्तीसाठी आहे हे समजून घेतले पाहिजे. राजकीय पक्ष याला राजकीय मुद्दा बनवण्याचा प्रयत्न करत आहेत, परंतु त्यांनी हे समजून घेतले पाहिजे कीहा राजकीय मुद्दा नाही किंवा धर्माचा मुद्दा नाही हा राष्ट्रीय प्रश्न आहे जर आपण आता अपयशी ठरलो तर अनियंत्रित लोकसंख्येमुळे आपली येणारी पिढी पस्तावणार आहे. लोकसंख्या नियंत्रण कायद्यासाठी एकत्र येऊन सरकारला पाठिंबा देऊया.

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -32, औरंगाबाद इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, औरंगाबाद 431 005 (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. 205, 13 वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - 2, सिडको, जि. औरंगाबाद (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. (* पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद औरंगाबाद न्यायालयाच्या कक्षेत)
TITLE CODE -MAHMAR51117, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +91 90757 16739

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Aurangabad Industrial Co-op, Society, Station Road, Aurangabad 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Aurangabad (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Aurangabad court.)
TITLE CODE -MAHMAR51117, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739



मच्छिंद्र ऐनापुरे
जत, जि. सांगली

# अनेक ट्रेंडची सुरुवात करणारा : अमिताभ बच्चन

आधुनिक केसरी

**आज ‘कौन बनेगा करोडपती’ आणि अमिताभ बच्चन हे एक घट्ट समीकरण झालं आहे. त्यामुळे या शोच्या चौदाव्या पर्वातही सूत्रसंचालक म्हणून अमिताभ बच्चन त्याच उत्साहाने प्रेक्षकांसमोर येत आहे. मात्र अलीकडेच अमिताभ यांनी एक मोठा खुलासा केला आहे. जेव्हा या शोचं सूत्रसंचालन करण्याविषयी पहिल्यांदा त्यांना विचारणा झाली तेव्हा ते लगेचच तयार झाले नव्हते. त्या काळात म्हणजे साधारण 22 वर्षांपूर्वी अमिताभ यांचे चित्रपट रुपेरी पडद्यावर सपशेल आपटत होते. नेमकं काय करायचं, याबद्दल स्पष्टता नसताना या शोसाठीचा निर्णय घेणंही त्यांच्यासाठी सोपं नव्हतं. मुळातच चित्रपट यशस्वी होवोत किंवा न होवोत, त्यांच्यासारख्या महानायकाने टीव्हीवर काम करू नये, असाच सल्ला त्यांना कुटुंबीयांकडून आणि परिचितांकडून मिळाला होता. मात्र आता ते कबूल करतायत त्यांची गेलेली प्रतिष्ठा याच टीव्ही शोने मिळवून दिली.**

आज त्यांच्याकडे सर्व काही आहे. प्रश्नमंजूषेच्या माध्यमातून एक कोटी रुपये जिंकण्याचं स्वप्न सर्वसामान्यांना दाखवणारे आणि त्याची पूर्ती करणारा हा शो टेलिव्हिजनवर 2000 साली दाखल झाला. तेव्हापासून आजवर या शोचे प्रदर्शक बदलले. आधी ‘स्टार प्लस’ वाहिनीवर हा शो प्रसारित होत होता. 2010 मध्ये तो ‘सोनी टेलिव्हिजन’कडे आला. वेळोवेळी या शोमध्येही अनेक बदल करण्यात आले. शोमधून मिळणारी रक्कमही वाढत गेली. पण केबीसीशी सूत्रसंचालक म्हणून जोडलं गेलेलं अमिताभ बच्चन यांचं नाव आजही कायम आहे. 22 वर्षे आणि चौदा पर्व या शोशी ते जोडले गेले. या शोची सुरुवातही योगायोगानेच झाली होती, असं अमिताभ यांनी सांगितलं. सगळीकडेच अपयश चाखायला मिळालेलं असताना टीव्हीसारखं तुलनेने नवं माध्यम आणि नव्या संकल्पनेचा शो करणं घरच्यांना फारसं पटत नव्हतं. त्यामुळे टीव्ही न करण्याचा सल्लाच आपल्याला मिळाला होता, असं त्यांनी कबूल केलं आहे. अमिताभ यांच्याशिवाय हा शो होऊच शकत नाही, असा निर्धार असलेल्या शोच्या कर्त्यांकरवित्या टीमने अखेर त्यांना लंडनमध्ये मूळ ब्रिटिश शो दाखवण्यासाठी नेलं होतं.

केबीसीचा प्रस्ताव घेऊन निर्माते जेव्हा त्याच्याकडे गेले, तेव्हाची परिस्थिती थोडी कठीण होती. मात्र त्यांच्याकडे या शोचं एक निश्चित स्वरूप होतं, त्यांची एक यंत्रणा होती. या शोची ही यंत्रणा, हा शो कसा आयोजित केला जातो ते पाहायला मिळेल का, अशी विचारणा त्यांनी केली होती. यासाठी निर्मात्यांनी त्याला चक्क इंग्लंडला नेले. तिथं हा शो प्रत्यक्ष कसा केला जातो, कसा चित्रित होतो, त्याचा सेट हे सगळं त्यांनी पाहिलं. त्या सेटवर जे वातावरण होतं ते तसंच मला मिळेल का? तो तसाच माहौल असेल तर मी हा शो करू शकेन, असं त्याने निर्मात्याला सांगितलं. त्याच्या सगळ्या अटी मान्य करण्यात आल्या। त्यामुळे अमिताभलाही यश मिळालं आणि केबीसीला! हा शो अमिताभने करायाला घेतला तेव्हा ते ते 57 वर्षांचे होते आणि आज 80 व्या वर्षीही ते त्याच उत्साहाने हा शो करत आहेत. हे माझं काम आहे आणि ते मला केलंच पाहिजे. उलट, मी वेगवेगळ्या प्रकारचं काम करत राहिलं पाहिजे, हा त्यांचा आग्रह असतो. आणि जोपर्यंत आपण प्रत्येक जण जिवंत आहोत तोवर प्रत्येकालाच चांगलं काम मिळवण्यासाठी, ते त्याच पद्धतीने करण्यासाठी झगडत राहिलं पाहिजे, असं ते म्हणतात.

आज बॉलीवूड आणि टीव्ही क्षेत्रातला त्यांना महानायक म्हटलं जातं. त्यांनी खूप उन्हाळे पावसाळे खाल्ले आहेत. त्याला यशदेखील सहजासहजी मिळालं नाही. 11 ऑक्टोबर 1942 रोजी अलाहाबाद येथे अमिताभ वच्चन यांचा जन्म झाला. त्यांचे शिक्षण इथेच सेंट मेरिज बॉइज हायस्कूलमध्ये झालं. शाळेतही ते इतर विद्यार्थ्यांपेक्षा पुढे होते. वर्गात ते अभ्यासाकडे लक्ष देत असत, तर मैदानातही ते खेळण्याचा पूर्ण आनंद घेत असत. घरी ते खोडकरपणे वागत असले तरी संक्रटाच्यावेळी त्यांच्यातील प्रगल्भता दिसे. वडिलांचे व्यक्तिस्वातंत्र्य जपण्याची कला त्यांना लहानपणीच अवगत झाली होती. डॉ. हरिवंशराय बच्चन हे अलाहाबाद विद्यापीठात प्राध्यापक होते. त्यांचा बराचसा वेळ वाचन आणि लिखाणात जाई. पतीच्या व्यस्त जीवनक्रमाशी तेजी बच्चन यांनी स्वतःला जुळवून घेतलं होतं. आपले वडिल विशेष व्यक्ती आहेत हे अमिताभ आणि अजिताभ या दोघा भांवडांनी स्वीकारल होतं. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर अमिताभ यांनी चंदीगडमधल्या सरकारी महाविद्यालयात प्रवेश घेतला. किरोरिमल कॉलेजचा प्रवेश निश्चित झाल्यावर त्यांनी दिल्लीला जाण्याचे ठरवले. आपल्या मोठ्या मुलाला दूर पाठवायला तेजी बच्चन सुरुवातीला तयार नव्हत्या. मात्र आता आपली मुलं मोठी झाली आहेत, ती आता दूर जाणार हे सत्य हरिवंशराय आणि तेजी बच्चन या दोघांनी समजून घेतलं.

पदवी घेतल्यानंतर अमिताभ यांनी कोलकात्यामध्ये पहिली नोकरी स्वीकारली. त्यांचे सुरुवातीचे दिवस साहसानेच भरले होते. त्यांचा दिवस पहाटे सुरू होऊन रात्री उशिरापर्यंत चालू राहायचा. जवळपास तीन वर्षे त्यांचा हा दिनक्रम होता. अशा प्रकारे त्यांचे आयुष्य सुरळीत सुरू असतानाही अमिताभ मनातून अस्वस्थ होते. मितभाषी आणि आत्ममग्न अमिताभ स्वतःचं स्वप्न इतरांना बोलून दाखवत नव्हते. त्यांचा भाऊ अजिताभदेखील तिथेच कोलकात्याला त्यांच्यासोबत होता. त्याने त्याची इच्छा ओळखली. एका मासिकात छापून आलेला चित्रपट प्रवेशाचा अर्ज त्याने एके दिवशी आणला. अर्जासोबत छायाचित्र आवश्यक होते. म्हणून स्वतः जवळील साध्या कॅमेराने त्याने अमिताभचा




फोटो काढला. अर्ज आणि फोटो पत्राद्वारे मुंबईला पाठवला. उत्तर येईल, असं अमिताभला वाटलं नव्हतं. पण लवकरच प्रतिसाद मिळाला. चांग़ल्या बातमीने नवीन निर्णय घ्यायलाही भाग पाडलं. प्रथम आलाहाबादला राहणार्‍या आई-वडिलांना कळवणं भाग होतं. त्यानंतर सुरक्षित नोकरीवर पाणी सोडून चित्रपट क्षेत्रातला जुगार खेळायला तयार राहायला हवं होतं. अमिताभ यांनी दुसरा पर्याय स्वीकारायचं ठरवलं. जुनी नोकरी आणि मित्रांना रामराम करत त्यांनी स्वप्ननगरी मुंबईच्या दिशेला कूच केली. के.ए. अब्बास यांनी ‘सात हिंदुस्थानी’ चित्रपटातल्या एका व्यक्तिरेखेसाठी अमिताभची निवड केली. 1969 साली प्रदर्शित झालेल्या या चित्रपटातल्या अमिताभच्या अभिनयाने अनेकजण प्रभावित झाले. या चित्रपटामुळे चांगल्या संधी येतील, ही अपेक्षा मात्र फोल ठरली. उलट महिन्याभरानंतर हे स्वप्न भयानक वास्तव समोर बनून आलं. स्टुडिओ ते स्टुडिओ फिरून , प्रत्येक निर्मात्याच्या दारावर टकटक करूनही भूमिका मिळत नव्हत्या. अमिताभ स्वाभिमानी असल्याने घरून आर्थिक मदत घेत नव्हता. त्यामुळे त्यांना अनेकदा उपाशीपोटी झोपावे लागले. चित्रपट निर्माता हृषिकेश मुखर्जी यांनी त्याला ‘गुड्डी’मधली भूमिका देऊ केली. पण तो ‘सात हिंदुस्थानी’ मध्ये काम करीत असल्याचे समजल्यावर त्यांनी अमिताभाऐवजी नवोदित समित भांजा याला संधी दिली. नंतर मुखर्जींनी राजेश खन्नाच्या ‘आनंद’मध्ये अमिताभला घेतले. हे 1970 साल होतं आणि एका संध्याकाळी पेट्रोलपंपावर पेट्रोल भरण्यासाठी गाडी उभी केली असता अमिताभकडे ऑटोग्राफ मागितला होता.

‘आनंद’मधल्या अमिताभच्या दमदार अभिनयामुळे खरं तर हा चित्रपट टेक ऑफ पॉईंट ठरला असता, मात्र अमिताभच्या नशिबात यश एवढ्या लवकर लिहिले नव्हते. त्यानंतर आलेले अकरा चित्रपट बॉक्स ऑफिसवर आपटले. परवाना, प्यार की कहानी, रेश्मा और शेरा, बन्सी बिरजू, बॉम्बे टू गोवा, एक नजर, रास्ते का पत्थर, संजोग, गरम मसाला, एक पाहुणी भूमिका आणि अखेरचा बंधे हाथ एकापाठोपाठ आले आणि मागे परतले. ही अपयशाची गाथा प्रकाश मेहरा यांच्या जंजीरने खंडित केली. 1973 साली आलेला हा चित्रपट अमिताभच्या करिअरचा टर्निंग पॉईंट ठरला. त्याने सहकलाकार जया भादुरीशी लग्न केलं. आणि दोन वर्षांनंतर ‘शोले’च्या बंगलोर इथल्या आऊटडोअर चित्रिकरणादरम्यान श्वेताचा जन्म झाला.

अँग्री यंग मॅनची प्रतिमा दशकभर कायम राहिली. अमिताभसोबत काम केलेल्या चित्रपटनिर्मात्यांनी त्याला अनेक प्रतिमा दिल्या. हृषिकेश मुखर्जींच्या चित्रपटातला अस्वस्थ, यश चोप्रा यांचा रोमांटिक , प्रकाश मेहरांचा गंभीर आणि मनमोहन देसाईंचा मनोरंजक अमिताभ प्रेक्षकांना दिसला. या व्यक्तिरेखांमध्ये विविध रंग भरण्याची चढाओढ सुरू झाली. काही वेळा ती प्रेक्षकांच्या पसंदीस उतरली. काही वेळा नुकसान झालं. हा नवा सुपरस्टार राजेश खन्नाच्या स्थानाला धक्के देऊ लागला आणि एक वेळ अशी आली की, या स्थानासाठी अमिताभला पसंदी देण्यात आली. अमिताभने राजेश खन्नाला मागे टाकले आणि सर्व दिग्दर्शकांनी त्याला नायक मानण्यास सुरुवात केली. असंख्य चाहत्यांचं स्वप्न पूर्ण झालं होतं. चित्रपट पंडितांनी बॉक्स ऑफिसवरील यशाला क्रांतीची उपमा दिली. दर शुक्रवारी अमिताभचे नवे सुपरहिट चित्रपट येऊ लागले.

अमिताभच्या लोकप्रियतेने कळस गाठला. आता केवळ ठिणगी पडायचा अवकाश होता आणि मनमोहन देसाई यांच्या ‘कुली’ चित्रपटावेळी ठिणगी पडली. पुनीत इस्सरसमवेत हाणामारीचे दृश्य करत असताना सुपरस्टारला अपघात झाला. जबरदस्त मार बसला. गंभीर जखमी झाल्याने त्याला रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्याच्या आईची मैत्रीण इंदिरा गांधी या त्याला भेटायला आल्याच्या बातम्यांनी हेडलाईन मिळवली. अवी टंडनच्या ‘खुद्दार’ची तिकिटे भरमसाठ किंमतीत काळ्या बाजारात विकली जाऊ लागली. सहा महिन्यानंतर त्याला घरी आणले गेले. तो बरा व्हावा,यासाठी सर्व देश प्रार्थना करू लागला. देशभरातून असंख्य पवित्र धागे पाठवण्यात आले. अनेकांनी उपास केले, तो वाचण्यासाठी यात्रा केल्या. त्याने बहिष्कार टाकलेल्या प्रसारमाध्यमांनाही स्वतःचा मान बाजुला ठेवला आणि घडलेल्या दुर्घटनेची दखल घेतली. काही काळ या घटनेने इतर सर्व झाकोळून टाकले.

त्याच्या चित्रपटातल्या नायकाप्रमाणे सुपरस्टार जादुईरीतीने पूर्ववत झाला. हळूहळू का होईना पण तो स्वतःच्या पायावर उभा राहिला. मनमोहन देसाईंच्या कुलीमध्ये ज्या दृश्यात तो जखमी झाला होता, त्याच दृश्याने त्याने कामाची सुरुवात केली. त्याच्या डोळ्यांमध्ये भितीचा लवलेश नव्हता. अपघातानंतर सर्वप्रथम ‘नमकहलाल’ प्रदर्शित झाला आणि त्यापाठोपाठ ‘कुली’ आला. या चित्रपटात अमिताभ जखमी झाल्याचं दृश्य फ्रीझ करून दाखवण्यात आलं. **(उर्वरित उद्याच्या अंकात)**



अरुण वि. देशपांडे
संपर्क क्र. 9850177342

# आशयपूर्ण अतीलघुकथांचा (अलक) संग्रह ‘अल्याड- पल्याड’

आधुनिक केसरी

**रसिक-वाचक हो नमस्कार. शब्दांचे रिमझिम, तुषार तुमच्यापर्यंत यावेत या उद्देशाने एका नव्या पुस्तकाचा परिचय करून देतो आहे. लेखक म. ना. दे म्हणजेच मयुरेश देशपांडे यांचा “अल्याड -पल्याड” हा गद्य-लेखनाचा संग्रह आहे. या लेखनाचे स्वरूप कथेचे असले तरी यातील सर्वच म्हणजे शंभरच्या शंभर कथा या अलक “अतीलघुकथा” स्वरूपातील आहेत. वाचकांना आकर्षित करून घेणारा हा “अति लघु कथा” - अलक “लेखन -प्रकार” तसा अजून नवीनच आहे. इंटरनेट आणि प्रिंट अशा दोन्ही माध्यमातून “अलक - अति लघु कथा” वाचकांच्या समोर येत आहेत.**

अशा “अलक” लेखनात अल्पावधीतवाचकांचा प्रतिसाद मिळवणारे इंटरनेटवरील सर्वपरिचित आणि आघाडीचे साहित्यिक म्हणावेत असे माझे मित्र - लेखक, कवी - म.ना. दे . हे आहेत.

म.ना.दे.-हे त्यांचे लेखन नाव आहे आणि होरापंडीत मयुरेश देशपांडे अशी त्यांची सार्वजनिक ओळख . त्यांना मिळालेल्या या ओळखीत त्यांच्या या “अलक .अति लघु कथा “लेखनाचा मोठा वाटा” आहे. माझा परिचय या लेखकाशी झाला त्याचे निमित्त “अलक” हेच आहे. त्यांच्या अलक “लेखनाचा मी चाहता -वाचक झालोय. गेल्या दोन-तीन वर्षांच्या ऑनलाईन सहवासात त्यांच्या अलक वाचून. अलक-लेखनाबद्दल अतिशय उद्बोधक चर्चाझाल्या आहेत. मयुरेश ऊर्फ म. ना. दे या व्यक्तिमधील - साहित्यीक आणि माणूस दोघे ही झालेल्याभेटीत आपल्याला भारावून टाकतात. त्याचे कारण त्यांच्या स्वभावातील “सहृदयता, संवेदनशीलता, माणसाविषयी असलेली अपार आस्था हे विशेष गुण आहेत. मला जाणवलेले हे स्वभावगुण - त्यांच्या “अलक -लेखनात” वाचकांना अगदी ठळक जाणवतील.

“अल्याड- पल्याड”मधील अलक वाचून या लेखनाचे साम्य मला माझ्या आवडत्या लेखन-प्रकाराशी - “हायकू”शी जोडावे वाटते. अल्पाक्षर -रमणीयता जी हायकूत जाणवली ती “अल्याड -पल्याड” मधल्या “अलक”मध्येही मला जाणवली. सतरा शब्दातली “हायकु रचना आणि म.ना.दे..यांची ..” पाच वाक्यातील “अति लघु कथा - अलक” यात एक समानता आहे ती म्हणजे मनाला थेट भिडण्याचे “सामर्थ्य “ जसे “हायकू”मध्ये असते ते अगदी तसेच म. ना. दे. यांच्या “अल्याड -पल्याड” मधील ‘अलक’मध्ये देखील आहे. माणसांच्या आयुष्यातील भावनिक -क्षणां लेखक -म.ना. दे. यांनी “फोटोत टिपावे असे अचूक टिपले आहेत. या फोटोजनिक अलक क्षण चित्र वाचकांच्या समोर उभे रहातात.

“पाच वाक्यातील ही अलक - शेवटच्या वाक्यात ..एक जीवनानुभव देऊन जाते” आणि वाचकांच्या मनात . “क्या बात कही ..! हो,असचे असते बरे का !
असे -स्वगत -आपोआपच येईल.

काही- अलक - उदहरण -

१. त्याने आत्मचरित्राची शेवटची काही पाने
मुद्दामच कोरी ठेवली. वाचकांना कळावे
संघर्ष अद्याप चालूच आहे...(पृ.१०७ ),

२. हे असे अंधारातच आयुष्य काढायचे का ?
लग्नाच्या पहिल्याचरात्री तिने त्याला प्रश्न विचारला .
त्याने तिला थोडे थांबायला सांगितले .
पाहता पाहता छपराला पडलेल्या छिद्रातून
चांदण्यांनी घरात प्रवेश केला
आणि सारे घर व्यापून टाकले .......(पृ.९७ )

३. त्याच्या संशोधनाला मिळालेल्या पारितोषिक बद्दल
वडिलांनी त्याला नवीन घड्याळ भेट दिले .
“थोडे काळा बरोबरहीचालावे असेचना ?”
“नाही रे वेड्या !, काळाने तुझ्या वेगाने चालावे
म्हणून त्याला थेट तुझ्या हाती बांधत आहे.. (पृ.९० )

४. तो खांब कोसळला ,
तसे ते छप्पर कलले .
त्याचाहीआधार होता
हे तेव्हा कळले .
एरवीकोपरा म्हणून
त्याच्या नशिबी अडगळच होती.


वरील अलक “वाचून खात्री पटेल की ,अशा एक से एक अलक “अल्याड -पल्याड” संग्रहात आहेत.

पालघर निवासी - लेखक-कवी - विकास तरे यांच्या शुभेच्छा या सुंदर अलक -अति लघु कथा “संग्रहास आहेत.

सुरेख -सुबक असा हा अलक- संग्रह. अल्याड -पल्याड आपल्या पर्यंत आणलाय. सासवडच्या परीस पब्लिकेशन आणि गिरीश दत्तात्रय भांडवलकर यांनी.

अलक- लेखन प्रकारात लेखक - म.ना.दे. यांच्या या “ अल्याड -पल्याड “या संग्रहाची महत्वपूर्ण दाखल घेतली जावो याच शुभेच्छा.

**अलक -संग्रह “अल्याड- पल्याड”**
**लेखक : म.ना.दे (होरापंडीत मयुरेश देशपांडे ),**
**पृ. ११२, संपर्क : ८९७५३१२०५९ , प्रकाशक :**
**गिरीश दत्तात्रय भांडवलकर, परीस पब्लिकेशन -**
**सासवड , जि. पुणे,**
**संपर्क : ८२७५६९१४२७.**



# कमी पटसंख्येच्या शाळा बंद करण्याचा घाट



सुरेश मंत्री
संपर्क क्र. ९४०३६५०७२२

आधुनिक केसरी

**शिक्षण विभागाने राज्यातील शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालकांना ० ते २० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळा किती आहेत आणि संबंधित शाळा बंद करण्याबाबत कार्यवाही कोणत्या स्तरावर सुरु आहे? याचा आढावा घेण्यास सांगितलं आहे. यालाच अनुसरून जिल्हानिहाय अतिरिक्त शिक्षक असतील, तर त्या शिक्षकांची माहिती द्यावी आणि अतिरिक्त शिक्षकांच्या समायोजनाबाबत काय कार्यवाही केली, याबाबत विचारणा केली आहे. त्याचप्रमाणे २८ ऑगस्ट २०१५ च्या निर्णयानुसार जिल्हानिहाय विद्यार्थी संख्या; तसेच संच मान्यतेनुसार मंजूर शिक्षक, शिक्षकेतर पदे, भरलेली पदे आणि रिक्त पदांबाबत विचारणा केली आहे. या पार्श्वभूमीवर शिक्षक आणि शिक्षकेतर पदांच्या संख्येवर निर्बंध येण्याची शक्यता नाकारता येत नसल्याचे चित्र आहे.**

मिळालेल्या आदेशानुसार ज्या-त्या जिल्ह्याच्या शिक्षणाधिका-यांनी याबाबत माहिती संकलन करण्यास सुरुवात केली असून प्रत्येक जिल्ह्यात अशा शाळांची संख्या मोठी असल्याचे समोर येत आहे. शिक्षण विभागाकडून जरी याबाबत माहिती संकलित करण्यात येत असली तरी या शाळा बंद करण्याबाबत अधिकृत दुजोरा देण्यात आलेला नाही. शिक्षण विभागाच्या आधीच्या निर्णयानुसार पहिली ते पाचवीच्या शाळा या विद्यार्थ्यांसाठी एक किलोमीटर अंतरावर असाव्यात तर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना शाळा तीन किलोमीटर अंतरावर असाव्यात असा आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला मोफत शिक्षण मिळावे आणि शाळा जवळ असावी असा शिक्षण हक्क कायदा सांगतो, त्यामुळे अशा प्रकारच्या शाळा बंद झाल्यास शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली होईल असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. त्यामुळे पुन्हा एकदा अशा शाळा बंद करायला विरोध केला जाण्याची शक्यता आहे. २०१७ साली भाजप-शिवसेना युतीचं सरकार असताना ० ते २० विद्यार्थी संख्या असलेल्या राज्यातील १३१४ शाळा बंद करण्याचा निर्णय शिक्षण विभागाने घेतला होता. त्यानंतर महाविकास आघाडी काळात सुद्धा अशाप्रकारे सूचना देण्यात आल्या होत्या. मात्र, ग्रामीण भागातील शिक्षक, पालक यांनी या निर्णयाला मोठा विरोध केल्याने सूचना देऊन सुद्धा शाळा बंद करण्यात आल्या नाहीत. मात्र, आता पुन्हा एकदा ० ते २० विद्यार्थी संख्या असलेल्या शाळा बंद करण्यात याव्यात आणि त्या किती बंद झाल्या आहेत किंवा कार्यवाही कशी सुरु आहे? याची सविस्तर माहिती शिक्षण विभागाने मागवली आहे.

महाराष्ट्र हे भारतातील पुरोगामी राज्य म्हणून ख्यातकीर्त आहे. शैक्षणिक, सामाजिक, उद्योग, व्यवसाय आदी क्षेत्रातील कार्याच्या माध्यमातून देशाला दिशादर्शक असा राज्याचा नावलौकिक आहे. महात्मा जोतीराव फुले, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुलेंच्या माध्यमातून महाराष्ट्रात देशातील स्त्री शिक्षणाची मुहूर्तमेढ रोवली गेली. शाहू छत्रपतींच्या माध्यमातून एकोणिसाव्या शतकात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे करणारे कोल्हापूर संस्थान व पर्यायाने महाराष्ट्र हे भारतातील पाहिले राज्य ठरले. गेल्या काही वर्षांमध्ये जिल्हा परिषद शाळांमध्ये चालणाऱ्या चांगल्या उपक्रमांच्या, नाविन्यपूर्ण प्रयोगांच्या माध्यमातून जिल्हा परिषद तथा सरकारी शाळा नावारूपाला आल्या आहेत. सरकारी शाळांकडे बघण्याचा सर्वसामान्य जनतेचा, पालकांचा दृष्टिकोन बदलत आहे, याचेच फलित म्हणून गेल्या काही वर्षांत सरकारी शाळेतील विद्यार्थ्यांचे प्रमाण वाढले आहे. वाडी, वस्ती, तांड्यावर लोकसहभागातून शाळा भौतिक सुविधांची उभारणी करून नवनवे किर्तीमान रचत आहेत. अश्यावेळी सरकार या शाळांच्या शिक्षकांच्या, पालकांच्या पाठीशी ठाम उभे राहील अशी अपेक्षा असतांना आलेले हे पत्र व सुरू असलेली कार्यवाही, शाळा व शिक्षकांचे खच्चीकरण करणारी व त्यांना निराशेच्या गर्तेत लोटणारी ठरणार आहे. कल्याणकारी राज्य म्हणून शिक्षणावर केला जाणारा खर्च हा खरंतर उद्याच्या येणाऱ्या सुजाण आणि सुदृढ पिढीसाठी केलेली गुंतवणूक ठरणार आहे. त्यामुळे शाळेतील शिक्षकांकडे असणारी शाळाबाह्य कामे कमी करून रिक्त असणाऱ्या पदांची भरती करून शाळा सक्षमीकरण करणे आवश्यक आहे. मात्र लेखणीच्या एका फटकऱ्यात नावं लिहून यादी तयार करुन शाळा बंद करणे अन्याय आहे. शाळा घरापासून दूर अंतरावर जाते तेव्हा मुलींचे शिक्षण थांबण्याचा धोका निर्माण होतो. प्रत्येक शाळा म्हणजे स्वतंत्र परिसंस्था असते. म्हणून शाळांचा केस बाय केस स्टडी झाला पाहिजे. शैक्षणिक क्षेत्रातील कार्याबाबत दैदिप्यमान आणि मार्गदर्शक इतिहास असणाऱ्या महाराष्ट्र राज्यात २० च्या आत पटसंख्या असणाऱ्या शाळा बंद करण्याची सुरू असलेली तयारी अतिशय दुर्दैवी आणि प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकीकरणात अडथळा निर्माण करणारी तसेच केंद्र सरकारने पारित केलेल्या शिक्षण हक्क कायद्याची पायमल्ली करणारी ठरणार आहे.



जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये शिक्षण घेणारी मुलं ही सर्व सामान्य कुटुंबातील असून सद्याच्या महागाईच्या काळात शिक्षण देखील सोपे राहिलेले नाही. २० पेक्षा कमी विद्यार्थी असलेल्या शाळा सरसकट बंद झाल्यास लाखो गोरगरीब, वंचित, बहुजन व शेतकऱ्यांच्या मुले व खास करून मुली शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर जाऊ शकतील. २० च्या आत पटसंख्या असणाऱ्या बहुतांश शाळा या दुर्गम भागात व वाहतुकीच्या सोयी सुविधा नसणाऱ्या ठिकाणी आहेत. अश्यावेळी या शाळा बंद झाल्यास इथे शिकणारे लाखो विद्यार्थी शाळाबाह्य होण्याची भीती आहे. मुलींचे गळतीचे प्रमाण आधीच अधिक असताना या निर्णयाने प्राथमिक स्तरावरूनच हे गळतीचे प्रमाण वाढणे, बालमजुरी, बालविवाह अश्या इतरही सामाजिक समस्या यातून निर्माण होण्याची शक्यता आहे. वित्तीय भाराच्या नावाखाली शाळा बंद करण्याचे हे धोरण चुकीचे आहे. गेली दहा-बारा वर्षे आपल्या राज्यात पूर्ण क्षमतेने शिक्षक भरती झालेली नाही. डी.एड, बी. एड. झालेल्यांची संख्या दहा लाखांच्या घरात आहे तर टीईटी व टेट उत्तीर्ण दीड-दोन लाख असतील. शालेय शिक्षण विभागाने ६७ हजार ७५५ शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची पदे भरण्याची विनंती केली आहे. ही पदे भरल्यास राज्य सरकारवर खूप मोठ्या प्रमाणात आर्थिक ताण येणार आहे. राज्य सरकारच्या एकूण खर्चापैकी सुमारे १७ टक्के निधी शालेय शिक्षण विभागावर होत आहे. त्यातही महसुली खर्चापैकी मोठ्या प्रमाणात निधी हा वेतनावर खर्च होत आहे, अशी टिप्पणी केली आहे. त्यामुळे राज्यात शिक्षक आणि शिक्षतेकर कर्मचाऱ्यांची भरती होण्यावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. शिक्षणावर होणारा खर्च ही समाजाच्या प्रगतीसाठी केलेली गुंतवणूक असते, याचे भान राज्यकर्त्यांना असू नये आणि तेदेखील महाराष्ट्रासारख्या राज्यात हे निव्वळ संतापजनक आहे. शिक्षणाचा ध्यास, ज्ञानाची असोशी ही प्रगत, पुरोगामी महाराष्ट्राची वैशिष्ट्ये आहेत, हे आपण कसे विसरू शकतो ? प्राथमिक शाळांपुरता असणारा हा विषय आता माध्यमिक शाळांपर्यंत आला आहे. त्यामुळे या निर्णयाला शिक्षक, कर्मचारी, अभ्यासक आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींचा विरोध होण्याची शक्यता आहे. कमी पटसंख्येच्या शाळा बंद करणे म्हणजे स्वतःच्या पायावर धोंडा पाडून घेण्यासारखे आहे. सरकार असा आत्मघातकी विचार करत असेल तर वेळीच थांबावे. त्याऐवजी इतर उपाय शोधावेत.

# जागतिक मानसिक आरोग्य दिन

आधुनिक केसरी

**दरवर्षी आपण 10 ऑक्टोंबर रोजी जागतिक मानसिक आरोग्य दिन साजरा करत असतो. या वर्षी जागतिक मानसिक आरोग्य दिन 2022 ची थीम "सर्वांसाठी मानसिक आरोग्य आणि तंदुरुस्तीला जागतिक प्राधान्य द्या "ही आहे. महामारीचा आपल्या मानसिक आरोग्यावर परिणाम होत असताना, आणि सुरूच आहे, जागतिक मानसिक आरोग्य दिन २०२२ च्या माध्यमातून पुन्हा कनेक्ट होण्याची क्षमता आम्हाला मानसिक आरोग्याचे संरक्षण आणि सुधारण्यासाठी आमच्या प्रयत्नांना पुन्हा प्रज्वलित करण्याची संधी देईल.**

मानसिक आरोग्याच्या अनेक पैलूंना आव्हान दिले गेले आहे; आणि 2019 मध्ये साथीच्या आजाराआधीच जागतिक स्तरावर अंदाजे आठ लोकांपैकी एक मानसिक विकाराने जगत होता. त्याच वेळी, मानसिक आरोग्यासाठी उपलब्ध सेवा, कौशल्ये आणि निधीचा पुरवठा कमी आहे आणि आवश्यकतेपेक्षा खूपच कमी आहे, विशेषतः कमी आणि मध्यम उत्पन्न असलेल्या देशांमध्ये.कोविड-19 साथीच्या आजाराने मानसिक आरोग्यासाठी जागतिक संकट निर्माण केले आहे, ज्यामुळे अल्प आणि दीर्घकालीन तणाव निर्माण झाला आहे आणि लाखो लोकांचे मानसिक आरोग्य बिघडले आहे. अंदाजानुसार, साथीच्या आजाराच्या पहिल्या वर्षात चिंता आणि नैराश्याच्या विकारांमध्ये 25% पेक्षा जास्त वाढ झाली आहे. त्याच वेळी, मानसिक आरोग्य सेवा गंभीरपणे विस्कळीत झाल्या आहेत आणि मानसिक आरोग्य स्थितींसाठी उपचारांची दरी वाढली आहे.वाढती सामाजिक आणि आर्थिक असमानता, प्रदीर्घ संघर्ष, हिंसाचार आणि सार्वजनिक आरोग्य आणीबाणीचा संपूर्ण लोकसंख्येवर परिणाम होतो, ज्यामुळे सुधारित कल्याणासाठी प्रगती धोक्यात येते; 2021 मध्ये जगभरातील तब्बल 84 दशलक्ष लोकांना बळजबरीने विस्थापित करण्यात आले. व्यक्ती, समुदाय आणि सरकार या नात्याने आपण मानसिक आरोग्यासाठी दिलेले मूल्य आणि वचनबद्धता आपण अधिक सखोल केली पाहिजे आणि सर्व क्षेत्रांतील सर्व भागधारकांद्वारे अधिक वचनबद्धता, प्रतिबद्धता आणि गुंतवणूकीशी ते मूल्य जुळले पाहिजे. आपण मानसिक आरोग्य सेवा बळकट केली पाहिजे जेणेकरुन मानसिक आरोग्याच्या गरजांची संपूर्ण स्पेक्ट्रम प्रवेशयोग्य, परवडणारी आणि दर्जेदार सेवा आणि समर्थनांच्या समुदाय-आधारित नेटवर्कद्वारे पूर्ण केली जाईल.

कलंक आणि भेदभाव हे सामाजिक समावेश आणि योग्य काळजी मिळण्यात अडथळा आहेत; महत्त्वाचे म्हणजे, कोणत्या प्रतिबंधात्मक मानसिक आरोग्य हस्तक्षेप कार्य करतात याबद्दल जागरूकता वाढविण्यात आपण सर्व आपली भूमिका बजावू शकतो आणि जागतिक मानसिक आरोग्य दिन ही एकत्रितपणे करण्याची संधी आहे. आम्ही अशा जगाची कल्पना करतो ज्यामध्ये मानसिक आरोग्याचे मूल्य, प्रोत्साहन आणि संरक्षण केले जाते; जिथे प्रत्येकाला मानसिक आरोग्याचा आनंद घेण्याची आणि त्यांच्या मानवी हक्कांचा वापर करण्याची समान संधी आहे; आणि जिथे प्रत्येकजण त्यांना आवश्यक असलेल्या मानसिक आरोग्य सेवेत प्रवेश करू शकतो.मानसिक आरोग्य आणि कल्याण सर्वांसाठी जागतिक प्राधान्य या थीमवर मोहीम सुरू करण्यासाठी जागतिक आरोग्य संघटना भागीदारांसोबत काम करेल. मानसिक आरोग्याची स्थिती असलेले लोक, वकील, सरकार, नियोक्ते, कर्मचारी आणि इतर भागधारकांना या क्षेत्रातील प्रगती ओळखण्यासाठी एकत्र येण्याची आणि मानसिक आरोग्य आणि कल्याण सुनिश्चित करण्यासाठी आपल्याला काय करण्याची आवश्यकता आहे याबद्दल बोलण्याची ही एक संधी आहे. सर्वांसाठी जागतिक प्राधान्य.



सांगळे किशोर
संपर्क : 7385945956

# केसीआर यांची राष्ट्रीय राजकारणात उडी

आधुनिक केसरी

**तेलंगणा राज्याचे मुख्यमंत्री आणि तेलंगणा राष्ट्र समिती या प्रादेशिक पक्षाचे अध्यक्ष के सी राव यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करून सीमोल्लंघन केले. के सी राव यांनी दसऱ्याच्या मुहूर्तावर आपल्या पक्षाची बैठक बोलवली होती या बैठकीला तेलंगणा राष्ट्र समितीचे २८३ आमदार खासदार व जिल्ह्याचे पदाधिकारी उपस्थित होते.**

या बैठकीत के सी आर यांनी आपला पक्ष राष्ट्रीय राजकाणात प्रवेश करणार असल्याची घोषणा केली इतकेच नाही तर त्यांनी आपल्या तेलंगणा राष्ट्र समिती या पक्षाचे भारत राष्ट्र समिती असे नामकरणही केले. राष्ट्रीय राजकारणात प्रवेश करण्याच्या त्यांच्या घोषणेचे उपस्थित सर्व आमदार खासदार व पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी स्वागत केले. के सी आर यांनी अशाप्रकारे राष्ट्रीय राजकारणात उडी घेतल्याने अनेकांना आश्चर्य वाटत असले तरी राजकारणातील जाणकार व्यक्तींना मात्र याचे जराही आश्चर्य वाटले नाही कारण मागील दोन वर्षात के सी आर यांनी जे राजकारण केले आहे ते राष्ट्रीय राजकारणात उडी घेण्याचेच निदर्शक होते. विशेषतः के सी आर यांनी तेलंगणामध्ये जेंव्हा दुसऱ्यांदा पूर्ण बहुमत मिळवून सत्तेत आले तेंव्हापासून ते स्वतःला राष्ट्रीय राजकारणाचा केंद्रबिंदू मानू लागले आहेत. सुरवातीला म्हणजे मुख्यमंत्रीपदाच्या पहिल्या कारकिर्दीत त्यांनी मोदींशी जुळवून घेतले आणि काँगेस व चंद्राबाबू नायडू यांच्याशी पंगा घेतला मात्र तेलंगणामधून काँग्रेस आणि चंद्राबाबू नायडू यांचा तेलगू देसम पक्ष कमकुवत झाले तसे त्यांनी भाजपला प्रमुख विरोधक मानून भाजपला विरोध सुरू केला. के सी आर यांचा भाजप विरोधाला केवळ स्थानिकच नव्हे तर राष्ट्रीय राजकारणाचीही किनार आहे ती अशी की, केंद्रात भाजपला प्रमुख विरोधक असलेली काँग्रेस गलितगात्र झाली आहे अशावेळी विरोधी पक्षांची मोट बांधून विरोधी पक्षांच्या आघाडीचे नेतृत्व आपल्या हाती आले तरी आपण २०२४ ला पंतप्रधान पदाचे दावेदार ठरू असे स्वप्न त्यांना पडत आहे त्यामुळेच गेली काही दिवस ते सातत्याने विरोधी पक्ष नेत्यांच्या भेटी घेत आहेत. मागील काही महिन्यात त्यांनी सोनिया गांधी, शरद पवार, नितीश कुमार, अरविंद केजरीवाल, स्टॅलिन, ममता बॅनर्जी या विरोधी पक्ष नेत्यांच्या भेटी घेतल्या आहेत. सर्व विरोधी पक्षांनी एकत्र येऊन २०२४ साली भाजप समोर एक पर्याय उभा करावा असे त्यांनी या नेत्यांना सांगितले आहे. प्रसंगी विरोधी पक्षांची आघाडी करून त्या आघाडीचे नेतृत्व करण्याची तयारीही त्यांनी दर्शवली आहे. विरोधी पक्षांची आघाडी करून भाजपला शह देण्याचा त्यांचा प्रयत्न स्तुत्य असला तरी तो वाटतो तितका सोपा नाही कारण वर उल्लेख केलेले सर्वच नेत्यांची पंतप्रधान होण्याची इच्छा आहे. २०२४ साली जर विरोधी आघाडीचे संख्याबळ भाजपपेक्षा अधिक झाले तशी होण्याची शक्यता नाहीच तरीही समजा तसे झाले तरी वर उल्लेख केलेले नेते के सी आर यांना पंतप्रधान म्हणून स्वीकारणार नाही. शिवाय वर उल्लेख केलेल्या सर्वच नेत्यांचीविचारधारा वेगळी आहे त्यामुळे ते किती काळ एकत्र राहतील हा प्रश्नच आहे. त्यामुळे विरोधी पक्षांची आघाडी करणे आणि तिचे नेतृत्व करणे हे के सी आर यांचे स्वप्नच ठरण्याची शक्यता आहे. नरेंद्र मोदी यांची जागा घेण्याची के सी आर यांची महत्वाकांक्षा म्हणूनच हास्यास्पद ठरते. राजकीय नेत्यांच्या मनी महत्वाकांक्षा हवीच मात्र अशी महत्वाकांक्षा बाळगताना स्वतःचे हसे होणार नाही याचीही काळजी राजकीय नेत्यांनी घ्यायला हवी. राष्ट्रीय राजकारणात उतरून के सी आर यांनीही असेच स्वतःचे हसू करून घेतले आहे काय ?



# सामान्य माणूस साहित्याच्या केंद्रस्थानी असला पाहिजे

## सृजन साहित्य संघाचे सातवे साहित्य संमेलन

आधुनिक केसरी न्यूज

**मूर्तिजापूर :** सृजन साहित्य संघाचे सातवे साहित्य संमेलन स्व. गजेश तोंडरे साहित्य नगरीमध्ये आयोजीत करण्यात आले होते. उद्घाटन समारंभामध्ये उद्घाटक म्हणून डॉ. चिंतामण कांबळे, संमेलनाध्यक्ष विनय मिरासे, स्वागताध्यक्ष रवी राठी त्याचप्रमाणे अतिथी म्हणून किरण अग्रवाल, सुरेश पाचकवडे, पुष्पराज गावंडे, अभयसिंह मोहिते, डॉ. आशीष खासबागे, श्याम कोल्हाळे, मा.रंजना तोंडरे आदी मान्यवर उपस्थित होते. दीप प्रज्वलन व प्रतिमा पुजनानंतर उपस्थित अतिथींचे स्वागत करण्यात आले. रवींद्र जवादे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. सामाजिक व सांस्कृतिक कार्यात महत्वाची भूमिका असणाऱ्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. रामकृष्ण आसरे, विनोद महल्ले, ह. बा. खंडारे यांच्या पुस्तकासह सागर लोडम यांनी काढलेला संमेलन विशेषांक सा. वऱ्हाडवृतचेही प्रकाशन याप्रसंगी करण्यातआले. यावेळी झालेल्या भाषणांमधून माणूस व माणसाचे जगणे हाच साहित्याचा केंद्रबिंदू असायला पाहिजे. हा सूर व्यक्त करण्यात आला. संमेलध्यक्ष विनय मिरासे यांनी साहित्यीकांनी समाजाच्या



व्यथा, वेदना लेखनात प्रतिबिंबीत व्हायला हव्यात ही अपेक्षा साहित्यीकांकडून केली. या प्रसंगी तृतीय पंथी नेहा गुरु दिलजान यांची आशा मुडे, मीना जवादे यांनी घेतलेली मुलाखत खास रंगली. या सत्राचे सुंदर संचालन प्रा. योगीता चिंचे व आभार प्रदर्शन निलिमा आष्टीकर यांनी केले. याप्रसंगी रामकृष्ण गावंडे व गुरु देव सेवा मंडळाची ग्रंथदिंडी आकर्षण ठरली. गोपाल पवार यांचे महानायक अमिताभ बच्चन यांच्या वरील चित्र प्रदर्शन उल्लेखनिय ठरले. यानंतर प्रमोद पंत यांच्या अध्यक्षतेखाली रंगलेले कविसंमेलन व संदीप वाकोडे यांनी अध्यक्ष म्हणून भूषवलेला बहारदार गझल मुशायरा संपन्न झाला. या कार्यक्रमांचे सुंदर संचालन पवन नालट व अमोल गोंड चवर यांनी केले. शेती - मातीसंबंधी परिसंवाद चांगला रंगला. प्रा. बाळकृष्ण रोकडे, उषा भोपळे यांनी महत्वाचे विचार मांडले. या प्रसंगी प्रा. अविनाश बेलाडकर सर यांनी, साहित्यामध्ये शेतीच्या व्यथेचे उपायात्मक प्रतिबिंब साहित्यात पडल्याची नोंद अध्यपदावरुन नोंदवली. समारोपीय कार्यक्रमामध्ये योगीता वानखडे, वनिता गावंडे यांनी साहित्य विचार मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रमोद पंत, किशोर आष्टीकर, वर्षा कावरे, विष्णु लोडम, विलास वानखडे, गजानन मोहरीर, प्रदीप येसनकर, संजना पंत, आसावरी पंत, विद्याताई गोसावी, तृप्ती उंबरकर, सुनिल ढोकणे, शैलेश गिरी यांनी परिश्रम घेतले.



# उपळा कालीमठ येथे महर्षी वाल्मिकी जयंती

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील उपळा कालीमठ येथे दरवर्षीप्रमाणे महर्षी वाल्मिक ऋषी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी आमदार उदयसिंग राजपूत यांनी उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या.

सर्व समाज बांधवांच्या वतीने उपळा येथील पोलीस पाटील कचरू बाविस्कर यांच्या हस्ते महर्षी वाल्मिक ऋषी यांची प्रतिमा ग्रामपंचायतीला सरपंच नामदेव जाधव यांच्याकडे देण्यात आली. याप्रसंगी सर्व समाज बांधव ,भजनी मंडळ, गावातील व पंचक्रोशीतील ग्रामस्थ व महिला माता भगिनी उपस्थित होते. सकाळी उपळा येथील कोळीवाडा येथून मिरवणुकीला सुरुवात झाली. संपूर्ण गावातून मिरवणूक झाल्या नंतर महर्षी वाल्मिक ऋषी यांची पूजा व अभिषेक करण्यात आले. त्यानंतर ह.भ.प. अशोक बापू जाधव यांनी रामायण पठण केले. त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रमाने सांगता करण्यात आली.

# शासकीय निवासस्थानाचे आ. किशोर पाटील यांचे हस्ते उदघाटन

आधुनिक केसरी न्यूज

**पाचोरा :** येथे उपविभागीय अधिकारी यांच्यासाठी हक्काचा निवारा असावा या भावनेतून व आ.किशोर अप्पा पाटील यांच्या पाठपुराव्या मूळे तथा तत्कालीन प्रांताधिकारी राजेंद्र कचरे यांच्या कार्यकाळात सूरु झालेल्या प्रांताधिकारी निवासाच्या प्रवासाची फलनिष्पत्ती झाली असून सुमारे ५९ लक्ष रुपये खर्चाचे भडगाव रोड वरील शासकीय विश्राम गृहाच्या परिसरात साकारलेल्या शासकीय निवास्थानाचे उद्घाटन आज सकाळी ११ वाजता आमदार किशोर अप्पा पाटील यांचे हस्ते संपन्न झाले यावेळी प्रांताधिकारी डॉ विक्रम बांदल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता दीपक पाटील, शेलार, उपअभियंता काजवे, अभियंता, उद्योगपती मुकुंद बिलदीकर, माजी नगराध्यक्ष संजय गोहिल, जिल्हाप्रमुख तालुका प्रमुख सुनील पाटील, माजी जिल्हा उपप्रमुख गणेश पाटील, माजी उपनगराध्यक्ष, बाजार समितीचे माजी संचालक, अनिल धना पाटील, शहर प्रमुख किशोर बारावकर, बंडू चौधरी, प्रवीण ब्राह्मणे



यांचे सह सर्व आजी माजी नगरसेवक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. शासकीय अधिकारी कर्तव्यावर असताना त्यांना घरी आल्यावर हक्काचे निवासस्थान असावे अशी अनेक वर्षांपासून मागणी होत होती. त्याची दखल घेत आ.किशोर अप्पा पाटील यांनी शासनाकडे या मागणीचा पाठपुरावा केला होता. पाचोऱ्यात तहसीलदार, पोलिस निरीक्षक, उपनिरीक्षक, अभियंते, पोलीस बांधव यांच्यासाठी देखील हक्काचा निवासस्थान असावे तसेच प्रत्यक गावात तलाठी कार्यालय असावे यासाठी आपला पाठपुरावा सुरू असून लवकरच सर्व अधिकाऱ्यांच्या व पोलीस बांधवांच्या निवासस्थानाचा प्रश्न देखील मार्गी लागणार आहे.

# बिडकिन येथे ईद ए मिलादुन्नबी निमित्ताने विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**बिडकिन :** पैठण तालुक्यातील बिडकिन येथे नुरानी ग्रुप हाकिम मोहल्ला यांच्या वतीने भव्य दिव्य रॅली चे आयोजन करण्यात आले होते तसेच रॅली मध्ये ईद ए मिलादुन्नबी निमित्ताने विविध धार्मिक घोषवाक्य व संदेशात्मक गितांचा समावेश होतो.भव्य दिव्य रॅली मध्ये छोट्या छोट्या मुलांसह थोर मोठे आणि मौलाना व जनसमुदायाचा समावेश होता.धार्मिक विधी पुर्ण करत गोड भात,रवा शिरा,व शरबत हि वाटप करण्यात आले. यावेळी काजी मुनीरोद्दिन,मौलाना निजाम, मौलाना वसीम, मौलाना अशपाक, मौलाना अमीर, शब्बीर शेख,फयाज पठाण, मीनाज इनामदार, सद्दाम इनामदार, रियाजोद्दीन इनामदार,असलम सय्यद, हाफिज इनामदार,लखन पठाण, शाहरुख पठाण,शफिक पठाण, सद्दाम सय्यद,अमजद शेख, अरबाज पठाण आदींची उपस्थिती होती यावेळी ईद ए मिलादुन्नबी निमित्ताने माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण,माजी पंचायत समिती सदस्य लतिफ कुरेशी, मनोज पेरे माजी सरपंच तथा नगरसेवक अशोक धर्मे, किरण गुजर, सागर फरताळे, गणेश काळे,संदीप गायकवाड, गोकुळ कांबळे यांच्या वतीने मुस्लिम बांधवांना शुभेच्छा देण्यात आल्या. बिडकीन पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक संतोष माने यांच्या



मार्गदर्शनाखाली मोठा पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बिडकीन व परिसरात रॅलीचे आयोजन करण्यात आले होते तसेच ठीक ठिकाणी महाप्रसाद व शरबतचेही वाटप समाज बांधवांच्या वतीने करण्यात आले.

# सरपंचपदी दंडे, उपसरपंचपदी चिंतामणी

आधुनिक केसरी न्यूज

**गंगापूर :** अगरकानडगाव येथील सरपंचपदी दिनकर कचरू दंडे व उपसरपंचपदी रेखाबाई शिवाजी चिंतामणी यांची निवड झाली. सरपंच पदासाठी दिनकर कचरू दंडे व विरोधात गुलाब अब्दुल शेख यांनी अर्ज केला त्यात दिनकर कचरू दंडे यांना ७ मते व गुलाब अब्दुल शेख यांना २ मते पडली. उपसरपंच पदासाठी रेखाबाई शिवाजी चिंतामणी व विरोधी मच्छिंद्र सोपान दंडे यांनी अर्ज केला. रेखाबाई शिवाजी चिंतामणी यांना ७ मते व विरोधी मच्छिंद्र सोपान दंडे यांना २ मते पडली. अध्यासिन अधिकारी बी.व्ही.जाधव यांनी सरपंच पदी दिनकर कचरू दंडे व उपसरपंच पदी रेखाबाई शिवाजी चिंतामणी यांची निवड केली. यावेळी ग्रामसेवक एस.एम. ठवाळ, तलाठी विश्वनाथ नागोर्डे, पोलीस पाटील दादासाहेब दंडे यांनी यावेळी निवडणूक प्रकियेस सहकार्य केले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य रेणुका दगडु पोकळे, रुपाली, सचिन लोहाळे, मुक्ताबाई उत्तम बर्डे, सायमा सोयब शेख , सुरय्या मुसा शेख, गुलाब अब्दुल शेख, मच्छिंद्र सोपान दंडे यांची उपस्थिती होती.



# अखिल भारतीय खो-खो स्पर्धेसाठी ऐईवीपीएम वुमन्स कॉलेजचा संघ रवाना

आधुनिक केसरी न्यूज

**कोल्हापूर :** येथे ९ ते ११ ऑक्टोबर दरम्यान होणाऱ्या एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या अखिल भारतीय अंतर महाविद्यालयीन खो-खो स्पर्धेसाठी औरंगाबादच्या ऐईवीपीएम वुमन्स कॉलेजचा संघ रवाना झाला आहे. एसएनडीटी महिला विद्यापीठाशी देशभरात सलग्न असणाऱ्या महाविद्यालयांच्या विद्यार्थिनींसाठी या अंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजित करण्यात आलेल्या आहेत. देश पातळीवर होणाऱ्या या स्पर्धेसाठी औरंगाबाद सिडको येथील ऐईवीपीएम वुमन्स कॉलेजच्या संघात मयुरी सोनेट, धनश्री पवार, गायत्री भोसले, अमृता माने, सीमा खान, प्रांजल सोनवणे, राजनंदनी वाघमारे, आरती वाडेकर, गायत्री असाळकर, काजल काळे आणि रेणुका कपाळे ह्या खेळाडूंची निवड




करण्यात आली आहे. मयुरी, धनश्री, गायत्री, अमृता, सीमा, प्रांजळ, राजनंदनी ह्या खेळाडू राष्ट्रीय खो-खो पटू असून त्यांच्याकडून चांगल्या कामगिरीची अपेक्षा आहे. या सर्व खेळाडूंना ऐईवीपीएम वुमन्स कॉलेजच्या संचालिका डॉ.केजल भारसाखळे, प्राचार्य डॉ.मिलिंद उबाळे, क्रीडा संचालिका डॉ.मानसी बर्दापूरकर यांनी यशस्वी वाटचाली करिता शुभेच्छा दील्या आहेत.

# नागझरी नदीवरील पूल गेला वाहून; 30 गावांतील नागरिकांचे हाल

## आमदार प्रशांत बंब साहेब तालुक्यातील पुलाच्या प्रश्नाकडेही लक्ष द्या : नागरिकांचा टाहो!

आधुनिक केसरी न्यूज

**गुलाब वाघ**

**गंगापूर :** तालुक्यातील वाळूज औद्योगिक वसाहती मधील नारायणपूर खुर्द येथील नागझरी नदीवरील पूल शुक्रवार 7 रोजी झालेल्या दमदार पावसात वाहून गेला आहे. या रस्त्याने लासुर स्टेशन पासून जवळपास 30 ते 35 गावातील कामगार वाळूज एमआयडीसी मधील कंपनीत कामासाठी दररोज ये-जा करतात. तसेच शेतकरी आपला शेतमाल विक्रीसाठी घेऊन येत असतात.हा पूल वाहून गेल्याने या गावातील कामगार, शेतकरी यांचा मार्ग बंद झाला असून, पर्यायी मार्ग म्हणून त्यांना मुंबई नागपूर महामार्गाचा वापर करावा लागत आहे.त्यामुळे जवळपास सात ते आठ किलोमीटर हेलपाटा मारून वाळूज औद्योगिक वसाहतीमध्ये जावे लागत आहे.त्यामुळे आमदार प्रशांत बंब यांनी शिक्षकांच्या मुख्यालय राहण्याचा प्रश्न पेक्षा पुलाचा प्रश्न महत्त्वाचा मानून आमदार बंब यांनी नागझरी नदीवरील पूल तत्काळ दुरुस्त करावा.असा टाहो शेतकरी कामगार बांधव करीत आहे माळीवाडा एकलाहिरा प्रतिमा 32 अंतर्गत नारायणपूर खुर्द येथे नागझरी नदीवरील पूल शुक्रवार सात रोजी झालेल्या पावसात वाहून गेला आहे हा रस्ता तीस ते पस्तीस गावाला वाळुज एमआयडीसी ला जोडणारा रस्ता आहे या रस्त्याने लासुरटेशन सुलतानाबाद सावंगी खडक नारळा गवळीशिवरा वसुसायगाव एकबुर्जी वाघलगाव पोंतुळ रांजणगाव पोळ आपेगाव गवळी धानोरा फुलशिवरा सिंधी शिरजगाव फातुलाबाद खोजेवाडी आंबेगाव टोके बर्गीपूर आसेगाव शहापूर बंजर माळीवाडगाव आधी जवळपास 30 ते 35 गावातील शेकडो कामगार दररोज कामासाठी तीनही शिफ्ट मध्ये कंपन्या येण्यासाठी या रस्त्याचा वापर करतात तसेच हजारो शेतकरी बांधव आपला शेतमाल व भाजीपाला विक्रीसाठी शॉर्टकट या रस्त्याने वाळुज एमआयडीसीत येत असतात.

शुक्रवार सात रोजी पडलेल्या दमदार पावसाने नारायणपूर खुर्द येथील नागझरी नदीवरील पूल वाहून गेला आहे त्यामुळे रस्त्यावरील चारच्या किंवा तो पूर्णपणे बंद झाले आहे तर दुचाकी स्वार आपला जीव धोक्यात घालून या वाहून गेलेल्या पुलावरून प्रवास करत आहे हा फुल वाहून गेल्याने परिसरातील 30 ते 35 गावातील नागरिकांचा रस्त्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पुल वाहून गेल्याने नागरिकांना एमआयडीसी मध्ये येण्यासाठी मुंबई नागपूर महामार्गावरून साजापूर फाटा चा वापर करावा लागत आहे त्यामुळे सात ते आठ किलोमीटरच्या अंतर वाढत असल्याने त्यांना जवळपास आठ किमी मारून औद्योगिक वसाहतीत यावे लागत आहे त्यामुळे वेळेचा अपयवाबरोबरच आर्थिक भार सोसावा लागत आहे. शिक्षकांच्या मुख्यालय राहण्याच्या प्रश्नाकडे लोकांचे लक्ष वेधून घेत आमदार महाराष्ट्रात चर्चेत आले आहे. मात्र मतदारसंघातील रस्तेसारख्या मूलभूत प्रश्नाकडे त्यांचे पूर्णपणे दुर्लक्ष झाले आहे. तालुक्यातील जवळपास सर्वश्रेष्ठ यांची अवस्था आता दयनीय आहे. त्यातच नागझरी नदीवरील पूल वाहून गेल्याने हजारो कामगार व शेतकऱ्यांचे हाल होत आहे.त्यामुळे आमदार बंब यांनी शिक्षकांच्या मुख्यालय राहण्याच्या प्रश्नाबरोबरच या पुलाच्या दुरुस्तीकडे तसेच इतर रस्त्याच्या प्रश्नाकडे लक्ष द्यावे, अशी अपेक्षा नागरिकांमधून व्यक्त होत आहे.



या पुलाच्या कामासाठी एक वर्षापासून सार्वजनिक बांधकाम विभागाकडे ग्रामपंचायत च्या माध्यमातून पाठपुरावा करत आहे. मात्र संबंधित अधिकारी याकडे दुर्लक्ष करत आहे. त्यामुळे या पुलाच्या कामासाठी आमदार सतीश चव्हाण यांच्याकडे मागणी केली आहे. त्यांनी लवकरच संबंधित विभागामार्फत काम करून देण्याचे आश्वासन दिले आहे.
**-सुभाष बनकर**

फुल वाहून गेल्याने 30 ते 35 गावातील नागरिकांची हाल होत आहे .वाहून गेलेल्या पुलावरून दुचाकी वाहनधारक धोकादायक रित्या प्रवास करत आहे. यातून जीवित हानी होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाने पुलाचे काम तात्काळ करावे अन्यथा शिवसेना स्टाईल आंदोलन करण्यात येईल.
**-प्रदीप सोनवणे,**
**उपसरपंच सिंधी शिरजगाव**



# तडेगाववाडी जि. प. शाळेत डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज

**भोकरदन :** तालुक्यातील तडेगाववाडी येथील ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद देत गावातील जि. प. प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांचे अध्ययन सुलभ होण्यासाठी लोकसहभागातून डिजिटल क्लासरूम उपलब्ध करून दिली आहे. त्यामुळे शाळेचे रुपडे पालटण्यास मदत झाली आहे. या सामाजिक उपक्रमाबद्दल शिक्षण क्षेत्रातील विविध मान्यवरांनी तडेगावाडी येथील जिल्हा परिषद शाळेतील शिक्षक व ग्रामस्थांचे कौतुक केले आहे. भोकरदन पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी दिलीप शहागडकर,शिक्षण विस्तार अधिकारी भिमराव बडगे, गटसमन्वय एस.बी. नेव्हार, केंद्रप्रमुख सुभाष भुजंग, सरपंच राजूसिंग बमनावत, मुख्याध्यापक दीपक उगले आदी मान्यवरांच्या हस्ते डिजिटल क्लासरूमचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य बाबुलाल पांडे,सौ. सांडाबाई काकडवाल तसेच शिक्षणप्रेमी नागरिक दारासिंग जारवाल, गेब्ज फाउंडेशनचे राम काळे, विकास वाकडे, इंगळे आदी मान्यवर उपस्थित होते. तडेगाव वाडी हे तेराशे लोकवस्ती असलेले एक छोटस गाव. या गावात जिल्हा परिषद प्राथमिक शाळेचे इयत्ता पहिली ते पाचवी पर्यंत वर्ग आहेत. पूर्वी भौतिक सुविधांचा शाळेत अभाव होता. परंतु ग्रामस्थांनी सकारात्मक प्रतिसाद दिल्याने लोकसहभागातून शाळेचे रुपडे पालटण्यास मदत झाली आहे. अगोदर ग्रामस्थांनी शाळेची रंगरंगोटी, ध्वजकट्टा, पिण्याच्या पाण्याची टाकी, नळ कनेक्शन, प्रथोमोपचार पेटी आदी साहित्य उपलब्ध करून दिले आहे. तडेगाववडी येथील जिल्हा परिषद शाळेला शिक्षकांच्या संकल्पनेतून व ग्रामस्थांच्या सहकार्यातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उत्तम दर्जाचे शिक्षण मिळावे म्हणून आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सुसज्ज अशी वर्गखोल्या म्हणजेच डिजिटल क्लासरूम तयार करण्यात आली आहे.यामध्ये दोन अँड्रॉइड टीव्ही संच तसेच ट्रॉली स्पीकरही लावण्यात आले आहे. यावेळी गटशिक्षणाधिकारी दिलीप शहागडकर यांनी उद्घाटनपर भाषणात शाळेला डिजिटल क्लासरूम उपलब्ध करून दिल्याबद्दल ग्रामस्थ व शिक्षकांचे कौतुक केले. सूत्रसंचालन भगवान थेटे, प्रास्ताविक देठे, आभार प्रदर्शन काकडवाल यांनी केले. या कार्यक्रमास ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सीतानाईक तांडा येथे लंपी लसीकरण

आधुनिक केसरी न्यूज

**औराळा :** कन्नड तालुक्यातील सितानाईक तांडा येथे जनावरांचे लंपी रोग प्रतिबंधक लसीकरण करण्यात आले व पशुपालकांची मोठी संख्या असुन गायवर्गिय पशुधन संख्या सतराशे आहे. केंद्रीय अर्थराज्यमंत्री डॉ. भागवत कराड व आमदार प्रंशात बंब यांनी तालुक्या साठी तीस हजार लंपी लसी उपलब्ध करुण दिल्या आहे. या साठी भाजप जिल्हाउपाध्यक्ष संजय खंबायते लसीकरण करुण घेत आहे. सितानाईक तांडा येथे लसीकरण साठी त्यांनी पुढाकार घेतला होता.

या प्रसंगी उत्तम राठोड ओबीसी मोर्चा जिल्हा उपाध्यक्ष रोहीदास जाधव साहेब तालुका सरचिटणीस, तालुका उपाध्यक्षा तथा उपसरपंच पी के राठोड, युवा मोर्चा तालुका उपाध्यक्ष व सोसायटी सदस्य झबुसिंग पेलुसिग राठोड, सोसायटी व्हाईस चेअरमन पार्वतीबाई बाजीराव राठोड, विभाग प्रमुख सुदाम पवार, अमरसिंग सुका राठोड माजी सरपंच गबरू लालचंद जाधव माजी सरपंच धर्मु जाधव, शंकर दुधा राठोड, परसराम बुदा राठोड, निमीच भीमा राठोड, नंदलाल धर्मु राठोड, रघुनाथ उखा, राठोड, जय लाल गोविंद पवार, गोकुळ कन्हीराम राठोड, सोसायटी डायरेक्टर कैलास जाधव, मेघराज कुरा पवार, तुळशीराम तोताराम जाधव, जगन हेमा राठोड, संजय थाऊ राठोड, पशुधन पर्यवेक्षक डॉ. अनिल राठोड बहिरगाव, डॉ. नलावडे पशुधन पर्यवेक्षक साहेब पंचायत समिती कन्नड, डॉ. जनार्धन राठोड पशुधन पर्यवेक्षक पंचायत समिती कन्नड डॉ . प्रविण राठोड पशुधन पर्यवेक्षक कन्नड डॉ. जगदीश राठोड वडनेर, गोकुळ जाधव डॉ. बसराज पवार, डॉ. रोहित बर्डे पळशी, शुभम खरे भोकणगाव सरपंच व सदस्य चेअरमन सदस्य गावकरी भारतीय जनता पार्टी पदाधिकारी आदी उपस्थित होते.



# महाराष्ट्राने असा मुख्यमंत्री पाहिला जो काहीच कामाचा नव्हता : पावसकर

आधुनिक केसरी न्यूज



**औरंगाबाद :** महाराष्ट्राने असा मुख्यमंत्री पाहिला जो काहीच कामाचा नव्हता, म्हणून उद्धव ठाकरेंना पक्षाची धुरा तसेच मुख्यमंत्रीपद सांभाळता आले नाही. त्यामुळे सगळी मातीच झाली, असे स्पष्ट मत शिवसेनेचे ( शिंदे गट ) प्रवक्ते किरण पावसकर यांनी आधुनिक केसरीशी बोलताना व्यक्त केले. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेला नव्या पक्षप्रमुखाची गरज आहे का? या विषयावर ते आधुनिक केसरी शी बोलत होते. दसरा मेळाव्यात भाषण करताना मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे खूप थकल्यासारखे दिसत होते त्यामळे सभेला उपस्थित असलेल्यांचे ते लक्ष वेधून घेऊ शकले नाहीत या विषयी बोलताना पावसकर म्हणाले की, या अफवा आहेत. मुख्यमंत्री शिंदे हे जनतेशी थेट संवाद साधणारे नेते आहेत. त्यांच्या या गुणामुळेच आज ते या पदापर्यंत पोहोचले आहेत. याऊलट उध्दव ठाकरे यांचा पिंड हा दौरे करण्याचा नाही ते पक्षाचा आणि मुख्यमंत्री पदाचा कारभार घरातूनच चालवत होते. बऱ्याच वेळा ते आजारी राहात होते. बाळासाहेब असतांनाही त्यांनी कधी दौरे केले नाहीत उध्दव यांच्यामुळेच राज, नारायण राणे, शिवसेना सोडून गेले. त्याच्या अगदी उलट एकनाथ शिंदे यांचे आहे. त्यांना लोकात मिसळायला आवडते ते बाहेर फिरून प्रत्येकाशी संपर्क ठेवतात पहाटे ३/ ४ वाजे पर्यंत कामात असतात. त्यामुळे पक्षाचे प्रमुख व मुख्यमंत्री पद या दोन्ही जबाबदाऱ्या ते अगदी सक्षमपणे सांभाळतात, म्हणून आमच्या शिवसेनेला वेगळ्या पक्षप्रमुखाची गरज नाही, असे शेवटी पावसकर म्हणाले.

# मोहम्मद (स.) पैगंबर जयंतीनिमित्त रक्तदान शिबिर

## शहराचा विकास हा शांततेवर अवलंबून असतो : आमदार फारुख शाह

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** हजरत मो. पैगंबर जयंतीनिमित्त दरवर्षाप्रमाणे आमदार फारुख शाह यांच्या नेतृत्वाखाली AIMIM पक्षाच्यावतीने व यंग एकता सोशल ग्रुप भोला बाजार आसिफ शाह यांच्या प्रयत्नाने भव्य रक्तदान शिबीर व हाजी अन्वर हॉस्पिटल तर्फे रोग निदान शिबिराचे उद्घाटन धुळे जिल्ह्याचे कर्तव्य दक्ष जिल्हा पोलीस अधिक्षक श्री.प्रविण पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळेस श्री.प्रविण पाटील यांनी आपल्या भाषणात सर्व मुस्लीम बांधवांना हजरत पैगंबर जयंती निमित्त शुभेच्छा दिल्या तसेच हिंदू बांधवांना कोजागिरी पोर्णिमेनिमित्त शुभेच्छा दिल्या व धुळे शहर आमदार यांच्या नेतृत्वाखाली होणाऱ्या रक्तदान शिबिराचे प्रशंसा केली व हा सण शांतते साजरा करावा असे धुळे शहर वासियांना आवाहन केले व आमदार साहेबांच्या सहकार्याबद्दल धन्यवाद व्यक्त केले. यावेळेस आमदार फारुख शाह यांनी आपले विचार व्यक्त करतांना सांगितले कि, कोणत्याही शहराचा विकास हा शांततेवर अवलंबून आहे. २००८ च्या दंगलीत जी काळिमा धुळे शहराला लागली आहे. ती पुसण्याच्या आम्ही प्रयत्न करत आहोत. त्या दंगलीत आम्ही हिंदू बांधवांना मदत केली. त्याच्याच फळामुळे आज मी धुळे शहराचा आमदार आहे. धुळे शहराचा विकास सर्वाना बरोबर घेवुन करण्याचा मी प्रयत्न करीत आहे. तसेच ईद मिलादूननब्बी च्या सर्व बांधवांना आमदार फारुख शाह यांच्या वतीने शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळेस मोठ्या संख्येने तरुणांनी रक्तदान केले. या कार्यक्रमाला आझाद नगर चे पोलीस निरीक्षक प्रमोद पाटील,सलीम शाह, सत्तार शाह, आसिफ शाह मुल्ला, आसिफ पोपट शाह, नगरसेवक सईद बेग मिर्झा, गनी डॉलर, हाजी जाहीद भाई,मौलवी शकील, नजर पठाण, गोलू शाह, खालीद भाईजी, जाकीर मुल्ला, महीला अध्यक्ष डॉ.दीपश्री नाईक, फातमा अन्सारी, पापा सर, शहर युवा जिल्हाध्यक्ष रफीक पठाण, व बहुसंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

# शिरपूर पोलिसांनी धूमस्टाईल पकडले चार आरोपी

## आरोपीकडून अग्निशस्त्र गावठी कट्टे घेतले ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** शिरपूर सपोनि सुरेश शिरसाट यांना गुप्त माहिती मिळाली की रोहिणी भोईटे गावाकडून शिरपूरच्या दिशेने एक ईरटीगा कार मध्ये अवैध शस्त्र असल्याची माहिती मिळाली त्यात बसलेले चार इसम गावठी कट्टे अग्निशस्त्र घेऊन जात असल्याची माहिती मिळताच संदीप पाटील भिकाजी पाटील,संजय सूर्यवंशी, संदीप ठाकरे, संजय भोई, कृष्णा पावरा, संतोष पाटील, मुकेश पावरा यांना तात्काळ रवाना करून सदरची ईरटीगा कार पोलिसांनी थांबण्याचा इशारा केला असता वाहन चालकाने न थांबता जोराने शिरपूरच्या दिशेने निघून गेले व ईरटीका कारचा पाठलाग करून तिला चिलारे गावाजवळ पकडले गाडीत बसलेल्या इसमांची हालचाल संशयस्पद वाटल्याने त्यांच्या गाडीची तपासणी करत असताना गिअर दांडीच्या जवळ असलेल्या फायबर पार्ट चे आडोशामध्ये लपवून ठेवलेले २ पिस्टल मॅक्झिन, ४ जिवंत काडतूस मिळून आल्याने सदर इसमांना ताब्यात घेतले त्यांचे नाव १) राहुल विष्णु शिंदे उस्मानाबाद, २)अमोल रवींद्र कोरडे तुळजापूर उस्मानाबाद, ३) ओमकार गणेश रणदिवे तुळजापूर उस्मानाबाद, ४)सुरज महताब शेख तुळजापूर उस्मानाबाद अशी आहेत त्यांना ताब्यात घेऊन ५०,०००/- रुपये किमतीच्या दोन गावठी बनावटी पिस्टल मॅक्झिन, २००० /- रुपये किमतीचे चार जिवंत काडतूस, ८,००,००० /- रुपये किमतीची एक मारुती कंपनीची एर्टिगा असलेले एकूण ८,५२,०००/- रुपये किमतीची सदरची कारवाई मा पोलीस अधीक्षक श्री प्रवीण कुमार पाटील,सो.अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत बच्छाव, सुप्रभारी मा.उपविभागीय पोलीस अधिकारी दिनेश आहेर यांचे मार्गदर्शनाखाली शिरपूर तालुका ठाण्याचे सुरेश शिरसाट, संदीप पाटील, भिकाजी पाटील, संजय सूर्यवंशी, संदीप पाटील, संजय भोई, कृष्णा पावरा व चालक संतोष पाटील, मुकेश पावरा यांनी केली असून सदर गुन्ह्याबाबत संदीप ठाकरे यांनी सरकारतर्फे फिर्याद दिल्यावरून पुण्याचा तपास भिकाजी पाटील करत आहेत.

# खुलताबादेत ईद-ए-मिलादचा उत्साह

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** ईद -ए-मिलादुन्नबी निमित्त खुलताबाद शहरात पैगंबर मोहम्मद यांचा पैरहन मुबारक (पवित्र पोशाख) व त्यांच्या मुह -ए-मुबारक (मिशीच्या केसाचे) दर्शन घेण्यासाठी लाखों मुस्लिम भाविकांनी बावीस ख्वाजा हजरत सय्यद जैनुद्दीन शिराजी रह.आणि ख्वाजा हजरत बाबा बुरहानोद्दीन यांच्या दर्ग्यामध्ये पहाटे पासूनच मोठी गर्दी केली केली आहे. दरम्यान हजरत ख्वाजा शेख मुन्तजीबोद्दिन जर जरी जर बक्ष यांच्या ७३६ व्या उरुसात देखील गर्दी होत आहे. खुलताबाद येथे १४०० वर्षांपूर्वीचा सातशे तीन वर्षांहून अधिक काळापासून सुरक्षित ठेवण्यात आलेल्या पैराहन-ए-मुबारक (पवित्र पोशाख) व मुंह-ए-मुबारकचे (मिशीचा केस) दर्शन घेण्यासाठी दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक आलेले आहे.हजरत ख्वाजा सय्यद जैनोद्दिन शिराजी यांच्या दर्ग्यात ७३६ वर्षांपासून पवित्र पोशाख व हजरत ख्वाजा बुरहानोद्दीन यांच्या दर्ग्यात मुंह-ए-मुबारक ठेवण्यात आला आहे. ईद-ए-मिलादुन्नबीच्या दिवशी म्हणजे पैगंबर मोहम्मद यांच्या जयंतीनिमित्त वर्षातून एकदा पवित्र पोशाख शनिवार दि.११ वाजता ते आज रात्री १० वाजेपर्यंत दर्शनासाठी काचेच्या पेटीत ठेवला जातो. या पवित्र पोषाखाच्या दर्शनासाठी जगाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या भाविकांनी शनिवारी रात्रीपासून रांगा लावल्या होत्या. रविवारी दिवसभर लाखो भाविकांनी पवित्र पोशाखाचे दर्शन घेतले. यावेळी उरूस व्यवस्था समिती व दर्गा कमिटीतर्फे भाविकांच्या सोयीसुविधांसाठी खास व्यवस्था करण्यात आली होती. भाविकांच्या सोयीसुविधांसाठी नियोजनबद्ध आराखडा तयार करून पोलीस उपविभागीय अधिकारी मुकुंद आघाव, पोलीस निरीक्षक भुजंग हातमोडे , दर्गा कमिटी हद्दे खुर्दचे अध्यक्ष शरफोद्दीन रमजानी , मोहम्मद एजाज़ व दोन्ही दर्गा कमिटी परिश्रम घेतले. ईद-ए-मिलाद निमित्त खुलताबाद येथे दर्शनासाठी आलेल्या भाविकांना सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्याबरोबरच सुरक्षिततेच्या दृष्टीने उर्स व्यवस्था समिती व पोलिसांनी विशेष काळजी घेत चोख बंदोबस्त ठेवला होता.फर्श मोहल्ला येथे ठिकठिकाणी बॅरिकेड्स लावण्यात आले होते. तसेच पोलिसांच्या खांद्याला खांदा लावून स्वयंसेवक ही भाविकांचे सेवे साठी परिश्रम घेत होते. मोफत पाणी व प्रसादाचे वाटप करण्यात आले.





# उद्योजक मनोज पवार यांनी जिगरबाज अजिंक्यचे केले कौतुक

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** नाशिक येथे भीषण खासगी बसलाच्या अपघातात गाडीतील १० प्रवासी आग लागल्याने होरपळून मृत्यु झाला. त्यात इतरही प्रवासी बस मध्ये होते त्यांना सगळ्यांना जीवाची पर्वा न करता कन्नड येथिल अजिंक्य पाटिल यांनी जखमी प्रवासी बाहेर काढून हॉस्पिटलमध्ये पोहचवले. अशा जिगरबाज अजिंक्यचे धाडसी कामाचे कौतुक करून त्यांचा सत्कार करतांना कन्नड शहरातील उद्योजक मनोज पवार यांच्या हस्ते करण्यात आला. तालुक्यात ही अजिंक्यचे कौतुक होत आहे. यावेळी मनोज देशमुख, संदेश पवार, संदिप घोंगते, बाळू बनकर, शंकर राऊत, आदित्य देशमुख, बंटी जाधव,गणेश घुगे, सोमनाथ दाभाडे, मयुर मोतीवाल, व्यंकटेश कामतीकर,रोहीत कुलकर्णी, प्रवीण घाटगे, शुभम नागरे, शुभम कवडे, सोपान शिरसाठ यांची उपस्थीती होती.

# स्पर्धा परीक्षाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन



आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील फर्दापूर येथे राष्ट्रीय सेवा योजने अंतर्गत राजकुंवर महाविद्यालय धनवट फर्दापूर येथे स्पर्धा परीक्षा संबंधी मार्गदर्शन शिबिर आयोजित करण्यात आले होते. यावेळी बालविकास प्रकल्प अधिकारी प्रभादेवी मुंबई, ईश्वर चिंतामण गोयर यांनी स्पर्धा परीक्षे मध्ये येणाऱ्या समस्या व त्यावरील निवारण यासंबंधी मार्गदर्शन केले या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक ए.जे बेडवाल, प्राध्यापिका टोके मॅडम, यांनी ही स्पर्धा परीक्षे संबंधी मार्गदर्शन केले . सदर मार्गदर्शन शिबिरा प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक ए. जे बेडवाल यांनी स्पर्धा परिक्षा मार्गदर्शन शिबीर स्पर्धा परीक्षेस येनाऱ्या समस्यांवर निवारण कस करता येईल यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मारगदर्शन केले. सूत्रसंचालन प्राध्यापक निलेश बावस्कर यांनी केले तर याप्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. फिरोज तडवी सर यांनी राष्ट्रीय सेवा योजनेचे महत्त्व सांगितले. या प्रसंगा वेळी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक वाय.आर. पाटील सर यांनी केले. या कार्यक्रमाच्या वेळेस प्राध्यापक सुनील बिराडे, प्राध्यापक गजानन पाटील, प्रा. नरेश शेळके, प्राध्यापक अक्षय पवार, प्राध्यापक कृष्णा शिरसाट, प्राध्यापिका मनीषा शिंदे, माधुरी सपकाळे, ज्योती मंगरूळे, पूजा गावंडे, पूजा गव्हाणे, व लोखंडे, सुगरा तडवी या उपस्थित होत्या.

# हिवरी येथे लम्पी स्कीन आजाराने जनावरांचा दुसरा बळी

## शेतकरी संतोष पाटील यांना तत्काळ नुकसान भरपाई देण्याची

आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील हिवरी/मोलखेडा फर्दापूर जिल्हा परिषद सर्कलमध्ये सावळदबारा परिसरात पशुसंवर्धन विभागाच्या वतीने लसीकरण मोहीम राबविली जात असली तरी लम्पी स्किन आजाराचा धोका अजूनही टळला नसल्याचे हिवरी गावात दिसून आले आहे. शेतकरी संतोष सरदार पाटील हिवरी यांच्या बैलाला लम्पी आजाराची लागण दि.२६/९/२२ रोजी झाली होती.सावळदबारा पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. शिपाई कागंले यांनी योग्य तो औषधी उपचार करून हि अल्पभूधारक शेतकरी संतोष पाटील याचां बैल दि.८/१०/२२ सांयकाळी दगावला यामुळे शेतकरी व पशुपालकांमध्ये चिंतेचे वातावरण निर्माण झाल्याचे आहे. सावळदबारा पशुवैद्यकीय केंद्रा अंतर्गत हिवरी डॉ, कांगले यांनी पंचनामा केला यावेळी उपसरपंच गुलाबसिंग राणा, वैभव गायकवाड, अमोल शेळके, जयदीप राणा, अमित राणा, दिपक इंगळे, कृष्णा पवार, सतीश देशमुख, अमोल देशमुख, कल्याण पाटील, शुभंम पाटील उपस्थित होते. पंचनामा करून जेसीबीच्या सहाय्याने खोल खड्डा खोदून त्या खड्ड्यात बैलाचा शेवटचा अंतिम संस्कार करण्यात आला. हिवरी, मोलखेडा परिसरात हिवरी येथे आतापर्यंत नेमक्या किती गुरांना लम्पी स्किन आजाराची लागण झाली आहे. याचा अकडा मात्र समोर आला नाही. हिवरी, मोलखेडा येथे बैलाचा दुसरा बळी गेला आहे. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे आणि संताजी सरदार पाटील यांना तात्काळ नुकसान भरपाई देण्यात यावी अशी मागणी भूषण राणा यांनी केली आहे.



# रोगनिदान शिबिरात दोन हजार भाविकांनी घेतला मोफत तपासणीचा लाभ

आधुनिक केसरी न्यूज

**पैठण :** स्वामी नरेंद्रचार्यजी महाराज यांचा पादुका दर्शन सोहळा पैठण औरंगाबाद रस्त्यावरील संत एकनाथ कारखाना परिसर येथे रविवार रोजी संपन्न झाला. या सोहळ्यानिमित्त पेंन्टागॉनसुपर स्पेशलिटी हॉस्पिटल औरंगाबाद यांच्या संयुक्त विद्यमानाने मोफत आरोग्य शिबिर संपन्न झाले या शिबिराचे उद्घाटन एमआयडीसी पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक भागवत नागरगोजे यांच्या हस्ते संपन्न झाले. या शिबिरामध्ये जवळजवळ दोनहजार भाविक भक्तांनीशिबिरात तपासणी करून घेतल्याचे शिबिराचे आयोजक कर्करोग तज्ञ डॉक्टर अशोक गलांडे यांनी दिली. संत एकनाथ साखर कारखाना परिसर येथे आज पेंटागॉन हॉस्पिटल यांच्या वतीने आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन सपोनि भागवत नागरगोजे, माजी पंचायत समिती सदस्य आप्पासाहेब सोलाट , तंटामुक्ती अध्यक्ष विठ्ठलराव थोटे, चेअरमन सचिन घायाळ, अनिल रोडे दादा चाबुकस्वार, ग्रामपंचायत सदस्य दादाभाऊ गलांडे, बिलाल भाई शेख,अरुण पाटील काळे, विलास पाटील दहीहंडे, उपसरपंच रहीम्मोदीन पठाण, सरपंच काका बर्वे, छावा तालुका अध्यक्ष किशोर सदावर्ते, ग्रापंस लाला कुरेशी, भरत मुकुटमल, संतोष घुले, सुशील बोडखे, गोपनीय शाखेचे गणेश शर्मा, कृष्णा उगले सह आदींच्या उपस्थितीत या शिबिराचे उद्घाटन झाले. या शिबिरामध्ये विविधतपासण्या मोफत करण्यात आल्या या शिबिरामध्ये ककर्करोग तज्ञ डॉक्टर अशोक गलांडे, डॉ . सारंग देशमुख, स्त्री रोगतज्ञ डॉ. अश्विनी गलांडे, डॉ. अजिंक्य देशमुख, डॉ. प्रफुल पांडे, डॉ. मिलिंद कुलकर्णी यांनी या ठिकाणी आलेल्या भाविक भक्तांची मोफत तपासणी केली. या शिबिरामध्ये जवळजवळ दोन हजाराच्याच्या पुढे भक्तांच्या मोफत रुग्ण तपासणी केल्याची माहिती या शिबिराचे आयोजक अशोक गलांडे यांनी दिली. शिबीर यशस्वी करण्यासाठी कैलास काळे, नितीन गावंडे, प्रवीण खरात,पप्पू गलांडेसह आदींनी परिश्रम घेतले .



# शिंदे-फडणवीस सरकारच्या मंत्रिमंडळात अनुभवहीन मंत्री


## माजी आमदार दिलीप वाघ यांचा घणाघात

आधुनिक केसरी न्यूज

**नाशिक :** पैशांचे खोके देऊन सरकार पाडण्यात भाजपला असुरी आनंद मिळत असतो. सध्याच्या मंत्रिमंडळात महाविकास आघाडीच्या तुलनेत अनुभवहीन मंत्री पाहायला मिळत आहेत. कुठल्याही प्रकारचा अनुभव नसताना अब्दुल सत्तार यांना कृषी मंत्रीपद देऊन शेतकऱ्यांचे आणि कृषी खात्याचे अप्रत्यक्ष नुकसान शिंदे-फडणवीस सरकारने केले आहे, असा घणाघात माजी आमदार दिलीप वाघ यांनी केला. भडगाव तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे जनसंवाद यात्रा सुरू असून, या यात्रेस पाचोरा-भडगाव मतदारसंघातून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. यात्रेदरम्यान मतदारसंघातील जनता विविध व्यथा मांडत केंद्र व राज्य सरकार यांच्याबद्दल तीव्र संताप व्यक्त करीत असल्याचे माजी आमदार वाघ यांनी सांगितले. जनसंवाद यात्रेनिमित्त पेंडगाव, शिंदी, कोळगाव, पिंप्रीहाट परिसरातील ग्रामस्थांशी माजी आमदार वाघ यांनी पदाधिकाऱ्यांसोबत जनतेशी संवाद साधला. त्यावेळी शेतशिवार रस्ते, पीकविमा आणि दुष्काळी पंचनामे न झाल्याच्या तक्रारी ग्रामस्थांनी मांडल्या. मुख्यमंत्री स्वतः मी रिक्षाचालक ते मंत्री असे सांगत असताना शिवसेनेने त्यांच्यावर केलेले उपकार विसरले. त्यांनी भाजपसोबत मिळून महाविकास आघाडी सरकार पाडण्याचे काम करीत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरेंच्या पाठीत खंजीर खुपसल्याची घणाघाती टीकाही त्यांनी केली. खतावर जीएसटी लावणार, हे सरकार जास्त दिवस टिकणार नाही, असे सांगत मतदारसंघातील प्रमुख समस्या विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्याकडे मांडून त्या सोडविण्यासाठी मी आणि पक्षाचे पदाधिकारी सक्षम आहोत. शेतकऱ्यांच्या समस्यांच्या निराकरणासाठी प्रसंगी रस्त्यावर उतरून आंदोलन करण्यात येईल, असेही त्यांनी सांगितले.



# अण्णा भाऊंची कविता म्हणत भास्कर जाधवांचा हल्लाबोल!



आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** शिवसेने'चे नाव आणि 'धनुष्यबाण' हे पक्ष चिन्ह गोठण्याचा हंगामी निर्णय निवडणूक आयोगाने शनिवार (८ ऑक्टोंबर) घेतला. एकनाथ शिंदेंच्या बंडानंतर नव्यानं उभारी घेत असलेला शिवसेनेला हा मोठा धक्का मानला जातो. यावरून राज्यातील राजकीय वर्तुळात आरोप-प्रत्यारोप सुरु आहेत. याप्रकरणावर शिवसेना नेते भास्कर जाधव यांनीही प्रतिक्रिया व्यक्त केली आहे.
प्रसारमाध्यमांशी बोलताना भास्कर जाधव म्हणाले, निवडणूक आयोगाने 'धनुष्यबाणा'बाबत दिलेला निर्णय सर्वांना धक्का देणारा आहे. या निर्णयातून सध्याच्या लोकशाहीचं भवितव्य काय हा प्रश्न निर्माण होतो. देशाची संसदीय लोकशाही प्रणाली राहणार की? हुकूमशाही, एकाधिकारशाही येणार. इंदिरा गांधी यांनी हिंमतीने तेव्हा आणीबाणी जाहीर केली होती. मात्र, सध्या देशात अघोषित आणीबाणी सुरु आहे," अशी टीका त्यांनी केंद्रातील भाजपा सरकारवर केली. पुढे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची कविता म्हणून दाखवत भास्कर जाधवांनी म्हटलं, ही न्यायव्यवस्था रखेल झाली, संसद देखील षंढाची हवेली झाली, मी माझ्या व्यथा मांडू कुठे. येथील न्यायव्यवस्था भ्रष्टतेने रंगीन झाली, अशा शब्दांत भास्कर जाधव यांनी हल्लाबोल केला आहे.

# ऐनवेळी ट्रेन रद्द झाल्यामुळे हाल

आधुनिक केसरी न्यूज



**नागपूर :** मध्य भारतात रेल्वेच्या पायाभूत सुविधांचे काम सुरू असून त्यासाठी वारंवार देशभरातील शेकडो रेल्वेगाड्या रद्द करण्यात येत आहेत. मात्र, रद्द झालेल्या गाड्यांमधील प्रवाशांची पर्यायी व्यवस्था करण्याची तसदी रेल्वेकडून घेतली जात नाही. त्यामुळे प्रवासी कुटुंबियांसोबत ठिकठिकाणी अडकून पडत असून त्यांचा पैसा आणि वेळेचा मोठा अपव्यय होत आहे.अलिकडे नागपूर ते बिलासपूर 'नॉन-इंटरलॉकिंग'चे काम करण्यासाठी तब्बल आठ ते दहा दिवस ५८ रेल्वेगाड्या रद्द करण्यात आल्या. यामध्ये काही लांब पल्ल्याच्या गाड्या होत्या. तसेच साप्ताहिक आणि विशेष गाड्यांचाही समावेश होता. रेल्वेने प्रवाशांना १२० दिवस आधी रेल्वे तिकीट आरक्षित करण्याची सुविधा दिली आहे. कुटुंबासह प्रवास करताना त्रास होऊ नये आणि सुरक्षित प्रवास व्हावा म्हणून लोक आगाऊ आरक्षण करून ठेवतात.मात्र, रेल्वेकडून अचानक रेल्वेगाडी रद्द केली जाते. त्यामुळे प्रवाशांचे सर्व नियोजन कोलमडते. त्यातल्या त्यात रेल्वे कोणतेही सहकार्य करीत नाही. उलट रेल्वेगाडी रद्द झाल्यानंतर २४ तासानंतर भाड्याची रक्कम परत केली जाते. ते देखील सेवा शुल्क कापून. रद्द झालेल्या गाड्यांमधील प्रवाशांना वाऱ्यावर सोडले जाते. त्यांची इतर रेल्वेगाड्यांमध्ये व्यवस्था केली जात नाही. एवढेच नव्हे तर अशा प्रवाशांना रेल्वे स्थानकावरील विश्रांती कक्षाची (रिटायरिंग रुम) सेवामुदत वाढवून दिली जात नाही. यासंदर्भात भारतीय यात्री संघाचे बसंतकुमार शुक्ला म्हणाले, रेल्वे सुविधांची यंत्रणा कोलमडली आहे. प्रवासी तीन-चार महिन्यांपासून तिकीट खरेदी करतो. यात प्रवाशांचा काय दोष आहे. प्रशासन ऐनवेळी रेल्वेगाड्या रद्द करते. पण, त्यांची पर्यायी व्यवस्था करीत नाही. माझे मित्र छत्तीसगड एक्सप्रेसने अंबाला (हरियाणा) २८ ऑगस्ट २०२२ ला गेले होते. त्यांचे परतीचे तिकीट छत्तीसगड एक्सप्रेसचे ३० ऑगस्टला २०२२ चे होते. त्याच दिवशी सकाळी साडेनऊ वाजता गाडी रद्द झाल्याचा संदेश पाठवण्यात आला. ही गाडी रात्री पावणे दहाची होती. रात्री परत जायचे असल्याने अंबाला रेल्वे स्थानकावरील 'रिटायरिंग रूम' २४ तासासाठी 'बुक' केले होते. म्हणजे रात्री ८ वाजेपर्यंत 'बुकिंग' होते. गाडी रद्द झाली आणि नागपूरसाठी अन्य साधने उपलब्ध नव्हती. त्यामुळे 'रिटायरिंग रूम'ची सेवा मुदतवाढ करण्याची विनंती करण्यात आली. पण, ती मान्य करण्यात आली नाही. शेवटी त्यांना आपल्या कुटुंबाला घेऊन हॉटेलमध्ये राहावे लागले. यावर आम्ही काहीच करू शकत नाही.

रेल्वेगाडी रद्द झाल्यानंतर प्रवासाचे भाडे परत केले जाते. प्रवाशांची व्यवस्था रेल्वे करीत नाही. तिकीट आणि विश्रांती कक्षाचा काहीही संबंध नाही. इतर कोणीही येथे येऊन राहू नये म्हणून 'पीएनआर' क्रमांकाशिवाय त्याचे 'बुकिंग' करता येत नाही."
**–रविशकुमार सिंह, वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक, दक्षिण–पूर्व–मध्य रेल्वे, नागपूर**

# अवकाळी पावसामुळे कांदा खराब

आधुनिक केसरी न्यूज



**मुंबई :** कृषी उत्पन्न कांदा बटाटा बाजार समितीत गेल्या काही दिवसांपासून कांद्याचे दर स्थिर होते, परंतु सोमवारी घाऊक बाजारात कांदा वधारला आहे. प्रतिकिलो मागे दरात कमीत कमी ५रु ते जास्तीत जास्त ७ रुपयांनी वाढ झाली आहे. पावसामुळे साठवणुकीचे कांदे मोठ्या प्रमाणावर खराब झाले आहेत. तर नवीन कांद्याना ही पावसाचा फटका बसलेला आहे. त्यामुळे बाजारात उत्तम दर्जाचे कांदे कमी येत असल्याने ही दरवाढ होत असल्याचे मत व्यापाऱ्यांनी व्यक्त केले आहे. नवीन लाला कांदे अद्याप बाजारात दाखल होत नसल्याने तसेच साठवणूकीचे कांदे खराब होत आहेत. त्यामुळे कांद्याच्या दराने उसळी घेतली आहे. मागील काही वर्षांपासून अवकाळी पावसाने जुन्या आणि नवीन कांद्याला झळ बसत आहे, परिणामी ऑक्टोबर- नोव्हेंबरमध्ये कांदा वधारत आहे. यावेळी ही मुसळधार पावसामुळे चाळीलीतील साठवणूकीचा जुना कांदा मोठ्या प्रमाणात सडलेला निघत आहे. सोमवारी बाजारात कांद्याच्या १४३ गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यापैकी ८०% कांदा खराब निघत आहे, तर अवघे २०% कांदा चांगला येत आहे. बाजारात उच्चतम दर्जाच्या कांद्याला जास्त मागणी आहे. त्यामुळे दरात वाढ झाली आहे, अशी माहिती व्यापारी मनोहर तोतलानी यांनी दिली आहे. गेल्या तीन ते चार महिन्यांपासून प्रतिकिलो १५रु ते २०रुपयांवर स्थिर असलेल्या कांद्याच्या दरात आता ५ते ७ रुपयांनी दरवाढ झाली आहे. कांद्याची दरवाढ झाल्याने गृहिणींना मात्र आर्थिक झळ बसणार आहे.

# गौण खनिज तस्करांवर कारवाईचा धडाका; १ कोटी ६२ लाखांचा मुद्देमाल केला जप्त

आधुनिक केसरी न्यूज



**भंडारा :** जिल्ह्यातील साकोली तालुक्यात सध्या मोठ्या प्रमाणात गौण खनिज तस्करी सुरू असून शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडविला जात आहे. महसूल विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांमुळे हा प्रकार राजरोसपणे सुरू असल्याचा आरोप होत आहे. सध्या गुन्हेगारांसाठी कर्दनकाळ ठरत असलेले नवे जिल्हा पोलीस अधीक्षक लोहित मतानी यांनी या अवैध गौण खनिज तस्करांच्या मुसक्या आवळण्यास प्रारंभ केला आहे. साकोली येथे गौण खनिज तस्करांवर धडक कारवाई करीत तब्बल १ कोटी ६२ लक्ष रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.
साकोली तालुक्यात सुंदरी व पाथरी येथे दोन वेगवेगळ्या गौण खनिज तस्करांविरोधात झालेल्या कारवाईमध्ये अग्रवाल ग्लोबल कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक प्रमोद पांडे व साईट व्यवस्थापक वरूण यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला असून दहा आरोपींना अटक करण्यात आली आहे. उल्लेखनीय आहे की, साकोली, सडक अर्जुनी व देवरी तालुक्यात राष्ट्रीय महामार्गाचे निर्माण कार्य सुरू आहे. या कामाचे कंत्राट अग्रवाल ग्लोबल प्रायव्हेट लिमिटेड कंपनीला दिले आहे. कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक व साईट व्यवस्थापक यांनी प्रशासकीय यंत्रणेला आर्थिकरित्या मॅनेज करून गौण खनिज मोठ्या प्रमाणात चोरी करीत असल्याची चर्चा प्रशासकीय वर्तुळात आहे. या अवैध गौण खनिज चोरीमुळे शासनाचा कोट्यवधींचा महसूल बुडत आहे. साकोली पोलिसांनी केलेल्या कारवाईमध्ये दहा आरोपींना अटक करण्यात आली असून चार टिप्पर, दोन ट्रॅक्टर व एक जेसीबी असा एकूण १ कोटी ६२ लाख रुपयांचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. सुंदरी गावातील कारवाईत अग्रवाल ग्लोबल कंपनीचे प्रकल्प व्यवस्थापक प्रमोद पांडे व साईट व्यवस्थापक वरूण या दोन आरोपींसह टिप्पर चालक महेश शेंडे, निलेश हरी खंडाते, मनोज कुमार, पुरण पासवान, अजय उखमा यादव, इम्तियाज नबी रसूल अन्सारी, या सातही आरोपींना पोलिसांनी अटक केली आहे. दुसऱ्या प्रकरणात पाथरी गावाच्या उत्तरेस असलेल्या नाल्यांमधून अवैधरित्या रेतीचे उत्खनन करणाऱ्या ट्रॅक्टर मालक पुरुषोत्तम अंताराम कापगते याच्यासह ट्रॅक्टर चालक अमर सेवक बोंडे, गुलशन गंगाराम बोरकर यांनाही अटक करण्यात आली आहे. या धडक कारवाईमुळे अवैध खनिज तस्करांचे धाबे दणाणले आहे. या कारवाईत ठाणेदार जितेंद्र बोरकर, सहाय्यक पोलीस निरीक्षक उईके, पुनम कुंभारे, हेड कॉन्स्टेबल राजेंद्र कुरुडकर, प्रशांत गुरव, पोलीस कर्मचारी किशोर फूंडे, मोहन वलथरे, अमित वडेट्टीवार, संदीप भगत, अश्विन भोयर, राजेश सयाम, महिला पोलीस हवालदार भुरे, वाहन चालक स्वप्निल गोस्वामी, रमेश एडमाके यांनी सहकार्य केले.



# धनंजय मुंडे म्हणाले, त्यांनी मला चकली देऊन राष्ट्रवादीत आणले

आधुनिक केसरी न्यूज

**बीड :** मी जेव्हा भाजपमध्ये होतो, तेव्हा मी भैय्यासाहेबांना ( अमरसिंह पंडितांना ) चकली देऊन भाजपमध्ये नेले ते आमदार झाले. त्यानंतर भैय्यासाहेबांनी (अमरसिंह पंडितांनी ) मला चकली देऊन राष्ट्रवादीत आणलं, मी आमदार झालो"....असे म्हणत राष्ट्रवादीचे नेते धनंजय मुंडे यांनी भाजप-राष्ट्रवादीत येण्याजाण्याचा किस्सा सांगितला. तर यावेळी त्यांनी मंत्री रावसाहेब दानवे, विरोधीपक्षनेते अंबादास दानवे आणि मंत्री संदीपान भूमरे यांच्यावर मिश्कील टिप्पणी केली. ते बीडच्या गेवराईमध्ये राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवार यांच्या उपस्थितीत आयोजित माजी मंत्री शिवाजीदादा पंडित यांच्या ८५व्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त कार्यक्रमात बोलत होते.

यावेळी धनजंय मुंडे यांनी म्हटले की मी अनेक मान्यवरांची भाषणं ऐकली, तशी ती वाचली होती. मात्र, आपण सगळ्यांनी ती ऐकली. तसं काही कुणाच्या भाषणांवर बोलायचं नाही, इथे सगळेच आलेले आहेत. म्हणजे सत्तेत असलेले दानवे साहेब देखील आलेले आहेत. आणि विरोधीपक्षात असलेले दानवे साहेब सुद्धा आलेले आहेत, म्हणजे हे दोघेही वनवे आहेत, अशी टिप्पणी धनंजय मुंडे यांनी केली.

ते पुढे बोलताना म्हणाले की, याठिकाणी भुमरे साहेब सुध्दा आलेले आहेत. मात्र, विरोधीपक्षनेते दानवे साहेब आणि भुमरे साहेब या दोघांना जावे लागले. आता स्वाभाविक आहे, की रोजगार हमीचे मंत्रिपद त्यांच्याकडे असल्यामुळे, जास्त वेळ कुठंही एका ठिकाणी बसता येणे शक्य नाही. मात्र, ते देखील याठिकाणी अभिष्टचिंतन करायला इथे आले, असा चिमटा धनंजय मुंडे यांनी काढला. त्याचबरोबर सर्वांचे भाषण ऐकल्यानंतर माझ्या लक्षात आले, कदाचित प्रत्येकांच्या कार्यालयातून दादांच्या बाबतीत एक वाक्यदेखील वेगळे लिहिलेले नाही, तशाला तशी स्क्रिप्ट आहे, असेही धनंजय मुंडे म्हणाले. त्यांचा रोख कुणाकडे ? असा सवाल यानिमित्ताने उपस्थित झाला.

तर माझ्या दृष्टीने शिवाजीदादांची खासियत काय ? माझ्या दृष्टीने दादांना हा महाराष्ट्र भीष्मपितामह का म्हणतो ?... तर एकदा का दादांनी टोपी कुणाच्या विरोधात काढली तर पुन्हा तो माणूस उठत नाही. दरम्यान दादांचे एक स्वप्न अधुरे आहे, ते आपण विजयराजेंना २०२४ च्या निवडणुकीत निवडून देऊन पूर्ण करु. तेव्हाच खऱ्या अर्थाने दादांच्या अभिष्टचिंतन सोहळ्याच्या शुभेच्छा ठरतील, असे आवाहनही धनंजय मुंडे यांनी केले.



# बदलापूर वेशीवर बिबट्याचा वावर; ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन

आधुनिक केसरी न्यूज



**बदलापूर :** बदलापूरच्या वेशीवरील ग्रामीण भागात गेल्या काही दिवसांत पुन्हा बिबळ्याचा वावर वाढल्याचे पाहायला मिळत आहे. बदलापूरजवळील चामटोली भागात बिबळ्याने काही दिवसांपूर्वी कोंबड्या आणि बकऱ्यांना ठार केल्याने ग्रामस्थांमध्ये भीती निर्माण झाली होती, तोच पुन्हा राहटोली भागात बिबळ्या आढळल्याचे बोलले जात आहे. त्यामुळे धास्तावलेल्या ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन वन विभागाकडून करण्यात आले आहे.

अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागात, विशेषकरून बदलापूरच्या वेशीवर गेल्या अनेक वर्षांपासून बिबळ्याचा वावर आढळून येतो. या भागात वावरणाऱ्या बिबळ्यांनी अनेकदा शेतकऱ्यांवर हल्ले करत गाई, वासरे, कोंबड्या आणि बकऱ्यांना ठार केले आहे. त्यामुळे या भागात ग्रामस्थांना सतर्क राहण्याचे आवाहन वन विभागाकडून सातत्याने करण्यात येत असते. शुक्रवारी राहटोली परिसरातून घरी परत जाणाऱ्या एका ग्रामस्थाला बिबळ्यासारखा प्राणी दिसल्यामुळे गावात भीती पसरल्यानंतर याबाबत गावकऱ्यांनी तत्काळ वन विभागाशी संपर्क साधला. त्यावेळी वन विभागाने ग्रामस्थांना सतर्क राहण्याच्या सूचना केल्या आहेत. वन विभागाचे पथकही या भागात बिबळ्याच्या हालचालीवर लक्ष ठेवून असल्याचे वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितले. पंधरा दिवसांपूर्वी बदलापूर वांगणी दरम्यान असलेल्या कासगाव भागात पहाटेच्या सुमारास एका ग्रामस्थाच्या घरासमोरील पिंजऱ्यात ठेवलेल्या कोंबड्यांवर बिबळ्याने हल्ला करून तीन कोंबड्या फस्त केल्या होत्या. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली होती. तसेच बिबळ्याच्या पाऊलखुणाही या भागात आढळल्या होत्या. याच काळात गोरेगाव, कासगाववाडी भागातही बिबळ्याने कोंबड्या आणि बकऱ्यांना मारल्याचे ग्रामस्थांनी सांगितले होते. या भागात जंगल असल्याने बिबळ्याचा वावर असण्याची शक्यता वन विभागाने वर्तवली असून या भागात फलकांद्वारे नागरिकांना मार्गदर्शन करत जनजागृती केली जात असल्याचे वन विभागाने सांगितले आहे. अंबरनाथ आणि कल्याण तालुक्याच्या तसेच मुरबाड तालुक्याच्या वेशीवर अनेक गावे असून यात अनेक आदिवासी पाड्यांचाही समावेश आहे. तर गेल्या वर्षभरातील या भागात जुन्नर तसेच इतर भागातून येणाऱ्या बिबळ्यांचा वावर पाहता हल्ल्याच्या घटना वाढल्या आहेत. त्यामुळे वन विभागाने केवळ तात्पुरत्या उपाययोजना न करता नागरीकांच्या सुरक्षिततेसाठी कायमस्वरूपी बिबळ्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी ग्रामस्थ करत आहेत.

# सेवा-गौरव पुरस्काराचे मान्यवरांच्या हस्ते वितरण

## आधार माणुसकीचा उपक्रमाचा सन्मान

आधुनिक केसरी न्यूज

**अंबाजोगाई :** येथील अनुसया बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्यावतीने शैक्षणिक, सामाजिक व पत्रकारितेच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींना रविवारी मान्यवरांच्या हस्ते सेवा - गौरव पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सेवानिवृती आदर्श शिक्षक भास्करराव धर्मपात्रे होते. प्रमुख पाहुणे म्हणूनमाधवराव इंगळे उपस्थित होते . या प्रसंगी पंचावन्न वर्षे समाजातील होतकरू मुलांना अध्यापन करणारे समाजशिक्षक रामकृष्ण पवार, आधार माणुसकीचा सामाजिक उपक्रमाचा आणि पत्रकार अविनाश मुडेगावकर व सेवानिवृत्त मुख्याध्यापक शिवकुमार निर्मळे यांना मान्यवसंच्या हस्ते सेवा - गौरव पुरस्कार देऊन सन्मानीत करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप गौरव पत्र, शाल व पुष्पगुच्छ असे होते. या प्रसंगी रामकृष्ण पवार, पत्रकार अविनाश मुडेगावकर, धनराज पवार, शिवकुमार निर्मळे, माधवराव इंगळे, भास्करराव धर्मपात्रे यांनी मनोगत व्यक्त केले. सुरुवातील डॉ. इंगोले यांनी पाहुण्यांचे स्वागत केले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोपाळ कुडके यांनी केले . शेवटी प्रशांत पवार यांनी सर्वांचे आभार मानले.



# पोलिसांसोबत चकमक; महिला माओवादी ठार

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** माओवादविरोधी अभियानादरम्यान पोलिसांबरोबर चकमक होऊन गुरुवारी एक महिला माओवादी ठार झाली. या चकमकीत आणखी काही माओवादी ठार झाले असण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे.

छत्तीसगड सीमेलगत अहेरी तालुक्यातील दामरंचा पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या कापेवंचा जंगलात माओवादी लपल्याची माहिती जिल्हा पोलिस अधीक्षक अंकित गोयल यांना मिळाली होती. त्यानंतर बुधवारी 'सी-६०' कमांडो पथकाच्या तुकड्या त्या भागात रवाना करण्यात आल्या. शोध मोहीम सुरू असताना बुधवारी सायंकाळी जवान आणि माओवादी यांच्यात चकमक झाली. रात्र झाल्याने कमांडो पथकाने त्याच भागात मुक्काम केला. गुरुवारी सकाळी शोध मोहीम पुन्हा सुरू करण्यात आली. या दरम्यान दोन ते तीन वेळा दोन्ही बाजूंनी गोळीबार झाला.

# छगन भुजबळ यांच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त 'अमृत महोत्सव' सोहळ्याचे आयोजन

## छगन भुजबळ यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे होणार प्रकाशन

आधुनिक केसरी न्यूज

**मुंबई :** राज्याचे माजी उपमुख्यमंत्री आणि अखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष छगन भुजबळ यांचा दिनांक १५ ऑक्टोबर २०२२ रोजी ७५ वा वाढदिवस साजरा होत आहे. त्या निमित्ताने छगन भुजबळ गौरव समितीच्यावतीने राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय खासदार शरद पवार यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक १३ ऑक्टोबर २०२२ रोजी दुपारी १.३० वाजता मुंबईतील षण्मुखानंद सभागृहात 'अमृत महोत्सव' सोहळ्याचे आयोजन करण्यात आले असून या सोहळ्यास अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहे अशी माहिती छगन भुजबळ गौरव समितीचे समन्वयक खासदार प्रफुल पटेल यांनी दिली आहे.

छगन भुजबळ गौरव समितीच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या या अमृत महोत्सवी सोहळ्यास राजस्थानचे मुख्यमंत्री अशोक गेहलोत,माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे,केंद्रीय सामाजिक न्यायराज्यमंत्री रामदास आठवले,जम्मू - काश्मीर नॅशनल कॉन्फरन्सचे अध्यक्ष डॉ.फारुख अब्दुल्ला, प्रज्ञावंत लेखक, कवी डॉ.जावेद अख्तर, विधानसभेतील विरोधी पक्षनेते अजित पवार यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

यावेळी ज्येष्ठ पत्रकार हर्षल प्रधान व विजय सावंत यांनी लिहिलेल्या छगन भुजबळ यांच्या जीवनावर आधारित पुस्तकाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच छगन भुजबळ यांच्या जीवनावर आधारित ७५ निवडक छायाचित्र पुस्तिका, फोटो बायोग्राफीचे देखील मान्यवरांच्या उपस्थित प्रकाशन करण्यात येणार आहे. या अमृतमहोत्सवी वाढदि वसानिमित्त राज्यभर सामाजिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार आहेत. यामध्ये विशेषतः सामाजिक प्रबोधनाचे कार्यक्रम राज्यभर घेतले जाणार आहे. छगन भुजबळ गौरव समितीमध्ये समन्वयक खासदार प्रफुल पटेल यांचेसह काँग्रेसचे नेते आणि माजी मंत्री बाळासाहेब थोरात, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, माजी मंत्री दिलीप वळसे- पाटील, खासदार सुप्रियाताई सुळे, आमदार कपिल पाटील, आमदार सचिन अहिर यांचा समावेश आहे.

# ट्रकच्या धडकेत महिलेने प्राण गमावले

आधुनिक केसरी न्यूज

**गडचिरोली :** आलापल्ली ते आष्टी ३५३ सी या राष्ट्रीय महामार्गावर ट्रकने दुचाकीला धडक दिल्याने दुचाकीवर मागे बसलेली महिलेचा जागीच मृत्यू झाला होता. या घटनेने संतप्त झालेल्या जमावाने तब्बल ७ ते १० ट्रक जाळल्याच्या घटना आज २७ सप्टेंबर रोजी सायंकाळच्या सुमारास घडली आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अंजली सुभाष जयदार (४२ रा.कांचनपूर ता.मुलचेरा) हे आलापल्लीकडून कांचनपूर आपल्या गावाकडे आपल्या पतीसोबत दुचाकीने जात होत्या. शांतिग्रामजवळ दामपूर फाट्यावर ट्रक आणि दुचाकीत आपघात झाल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला होता. या अपघातानंतर संतप्त नागरिकांनी या राष्ट्रीय महामार्गावर उभे असलेले तब्बल ७ ते १० ट्रक जाळले आहे.

काही गुप्त गोष्टी कुणाला सांगता येत नाहीत

(रविवारी मोफत तपासणी)

नस कमजोरी, शिघ्रपतन, शुक्रजंतू कमी, वांझपणा असल्यास भेटा..!

(33 वर्षात 1 लाख 60 हजार रूग्णांना मार्गदर्शन व उपचार केल्याचा अनुभवासह 150 पुरस्कारानी सन्मानीत)



डॉ. शेख ए.एच.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी

सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in